# आजचा सुधारक

विवेकवादी चिंतनाला वाहिलेले मराठी मासिक

वर्ष 26 अंक 8 नोव्हेंबर 2015

या अंकात


| | | |
|---|---|---|
| 2 | मानवजातीचे डोळस संमीलन | *राम बापट* |
| 2 | 'योगा'वर दावा कुणाचा? | *मीरा नन्दा* |
| 6 | विवेकी विचारांची मुस्कटदाबी | *प्रभाकर नानावटी* |
| 11 | ठाम आणि निश्चित भूमिका असणारे लेखन | *नागनाथ कोत्तापल्ले* |
| 15 | मानवी बुद्धी आणि ज्ञान | *य.ना.वालावलकर* |
| 21 | विवेकवाद विकसित करण्यासाठी... | *दत्ता देसाई* |
| 23 | महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या निमित्ताने ... | *राहुल वैद्य* |
| 26 | समानतेचे अवघड गणित | *कुमार केतकर* |
| 28 | इस्लामवादी दहशतवाद: पडद्यामागचे राजकारण | *डॉ.राम पुनियानी* |
| 31 | संघ बदलला की दलित विचारवंत? | *बी. व्ही. जोंधळे* |
| 33 | 'अस्तित्वाच्या प्रश्नांना विज्ञानाची उत्तरे' | *भालचंद्र काळीकर* |



संस्थापक – संपादक

**दि. य. देशपांडे**

(1917-2005)

कार्यकारी संपादक

**प्रभाकर नानावटी**



**संपर्कः**

प्रभाकर नानावटी pkn.ans@gmail.com 9503334895

भरत मोहनी bharat_i@yahoo.com 9822736808

aajacha.sudharak@gmail.com


www.aajachasudharak.in

# मानवजातीचे डोळस संमीलन

'समाजातील तंत्रविज्ञानाचा व अधिकतम प्रावीण्याचा विस्तार जोवर चालू असतो, तोवर प्रत्येक समाज बाहेरच्या समाजांच्या दडपणाला समर्थपणे तोंड देतो .किंबहुना तो फारच रसरशीत असला, तर दुबळ्या समाजांचे शोषण करण्यासही मागे-पुढे पाहत नाही .पण याउलट तो एकदा घसरगुंडीला लागला की, त्याचा अन्य समाजांशी चाललेला संघर्ष अधिकाधिक कष्टप्रद आणि अपयशी होऊ लागतो .जरा वेगळ्या भाषेत सांगावयाचे, म्हणजे एखादी संस्कृती अधिकतम प्रावीण्य प्राप्त करून घेईपर्यंत सतेज असते आणि तोपर्यंत ती जगातील एक उदयोन्मुख बलदंड सत्ता म्हणून मानली जाते . याउलट प्रगतीचे सर्वोच्च शिखर गाठल्यानंतर तिचे तेज मंदावत जाते व ती संस्कृती अन्य संस्कृतींचे भक्ष्य बनते .अशा रीतीने मानवी इतिहासात सत्ता व समृद्धीचे स्थलांतर अखंडपणे चालू आहे .म्हणून अंतर्गत व बाह्य घटकांचा व गतींचा एकत्र अभ्यास केला, तर असे दिसते की, आजवरचा सर्व मानवी इतिहास म्हणजे वर्ग व वर्ण यांची समाजांतर्गत अदलाबदल आणि सामर्थ्य व समृद्धी यांचे एका संस्कृतीतून व प्रदेशातून दुसऱ्या संस्कृतीत व प्रदेशात होणारे बाह्य स्थलांतर यांचा इतिहास होय, असे दिसून येईल.

*राम बापट*

•••

# ‘योगा’वर दावा कुणाचा?

*मीरा नन्दा*

इतिहास.....जात-धर्म....शिक्षण

भारतासाठी जसे ‘मॅक्डोनाल्ड’ तसे उत्तर अमेरिकेसाठी ‘योगा’. दोन्हीही मूळ स्थानापासून दूर परदेशात पक्के रुजलेले. अमेरिकेतील शहरी आणि ग्रामीण परिसरातील व्यायामशाळा, आरोग्य केंद्रे, चर्चेस अगदी सिनेगॉग्समध्येही योगाचे शिकवणी वर्ग चालू असतात. अमेरिकेतील जवळपास सोळा लाख लोकांच्या दररोजच्या व्यायाम प्रकारात योगाच्या कोणत्या ना कोणता प्रकाराचा समावेश असतोच. त्यामुळे दररोजच अमेरिकेतील लोक योगाबद्दल काही ना काही बोलत असतात, अर्थात व्यायामाच्या अंगाने. त्यांच्या व्यायामात शरीराला ताण देणारे, श्वासोच्छ्वासाचे किंवा आसनाचे हठयोगी व्यायाम प्रकार मुख्यत: असतात. ही आसने शिकविण्यासाठी बी.के.एस. अय्यंगार अथवा शिवानंद यांच्या पद्धतीने शिकविणारे, पट्टाभी जोईस यांचा ‘अष्टांग विन्यासा’ किंवा ‘पॉवर योगा’ शिकविणारे किंवा नुकताच ‘हॉट योगा’चा कॉपीराईट मिळविणारे बिक्रम चौधरी यांच्या पद्धतीने शिकविणारे भारतीय मूळ असलेले शिक्षक असतात. विवेकानंद, शिवानंद यांच्या अनुयायांनी लोकप्रिय केलेला “ध्यानयोग” मात्र फारसा लोकप्रिय नाही. अमेरिकेतील लोकांचा ओढा आसनांकडेच आहे यात काहीच आश्चर्य नाही कारण भारततही टीव्हीस्टार योगी बाबा रामदेवचे लाखो भक्त आसनाभीमुख योगच शिकतात.

अमेरिकेतील योग उद्योगाने आपल्या योग शिकवणीचा उगम कोठे आहे हे लपवून ठेवलेले नाही. उलट अमेरिकेसारखा जो देश तुलनेने तरुण आहे आणि सतत बदलत जाणारा आहे त्या देशात योगाची मानण्यात आलेली प्राचीनता (5000 वर्षापूर्वीची व्यायाम पद्धती वगैरे), पौर्वात्य अध्यात्मिक परंपराशी असलेला योगाचा संबंध अशा सर्व गोष्टी योगविक्री प्रक्रीयेतील एक भाग बनून गेल्या आहेत. नमस्ते करणे, ओमचे सूरयोजन, संस्कृत मंत्रांचे उच्चार ह्याही गोष्टी अमेरिकेतील योगाच्या भाग होऊन गेल्या आहेत. अमेरिकेतील योगाच्या अनेक स्टुडीओतून भारतीय शास्त्रीय

संगीत किंवा कीर्तन संगीताची धून वाजविणे, सुगंधी वास, ओमची चिन्हे अशाप्रकारच्या उपखंडातील छोट्या-मोठ्या वस्तू लावून अध्यात्मिक वातावरण निर्मिती केले जाते. अय्यंगार योगशाळेत त्यांची सत्रांची सुरवात दुसऱ्या शतकात होऊन गेलेल्या योगसूत्रांचा निर्माता 'पतंजली' याच्या प्रार्थनेने केली जाते. काही शाळेत पतंजलीची मूर्तीही बसविलेल्या आहेत. हे हिंदूकरण काही तंतोतंत सजवलेले नसते. योग शिकविण्याचा परवाना मिळविण्यासाठी योगशिक्षकांना हिंदू तत्वज्ञानाची आणि धर्मग्रंथांची जुजबी ओळख असणे गरजेचे असते.

अमेरिकेतील हिंदूंना या सगळ्याचा सार्थ अभिमान वाटत असेल, असे एखाद्याला वाटेल. पण अमेरिकेतील हिंदूंची वकिली करणारी संस्था, "हिंदू अमेरिकन फौंडेशन" (Hindu American Foundation, एचएएफ)ला मात्र अभिमान वगैरे काही वाटत नाही. उलट अलीकडेच त्यांनी आरोप केला कि अमेरिकेतील योग उद्योग हिंदुत्वाकडून योगाची चोरी करीत आहे. आपले प्रत्येक 'आसन' बौद्धिक मालमत्तेची चोरी आहे हे ऐकून अमेरिकेतील लाखो लोकांना धक्काच बसला. कारण त्यांनी योगाच्या मातृ परंपरेला मान्यता दिलेली नाही. एचएएफचे सहसंस्थापक आणि मुख्य प्रवक्ता असीम शुक्ला हे आता त्यांच्या हिंदू साथीदारांना सांगत आहेत की "योग आपला आहे तो आपल्याकडे 'वापस' घ्या आणि अध्यात्मिक परंपरेच्या बौद्धिक मालमत्तेचा दावा ठोका."

ही 'योगवापसी' मोहीम राबवणाऱ्या बहाद्दरांना अमेरिकेतील योग संस्था आणि इतर सांस्कृतिक संस्था, योगातील हिंदू चिन्हे आणि हिंदू कर्मकांडे यांची वाढती दृश्यात्मकता फारशी प्रभावित करू शकलेली नाही. त्यांची जेथे नजर जाते तेथे त्यांना हिंदूबाबतची न्यून भावना दडलेली वाटते. त्यांना वाटते की अमेरिकतील लोकांनी आता योगाचा विचार 'पातंजलीच्या योगसूत्रा' संदर्भात आणि हिंदुत्वाचा विचार 'महान वेदांच्या' संदर्भात केला पाहिजे. त्यांनी आता हिंदूंच्या संदर्भातील तो जुना पठडीबद्ध जात, गाय आणि आमटी (Indian curry) चा विचार सोडला पाहिजे. शुक्ला यांच्या भाषेत बोलायचे तर "हिंदुत्वाचा संबंध आता पवित्र गायीपेक्षा गोमुखासनाशी (एक कठीण आसन) जास्त तर रंगीबेरंगी आणि भटक्या साधूंपेक्षा अध्यात्मिक प्रेरणा देणाऱ्या पातंजलीशी जास्त आहे." त्यामुळे ही 'योग वापसी' मोहीम 'योगा' वगैरेपेक्षा भारतीय मानसिकतेतील बचावात्मकता आणि हिंदू विद्वत्तेबद्दलची अतिरंजित भावना यांचे विचित्र मिश्रण, संस्कृताळलेपण - हे जे हिंदू धर्माचे आणि संस्कृतीचे कंगोरे - आहेत त्याबद्दलच असल्याचे दिसून येत आहे.

न्युयॉर्क टाइम्सने आपल्या पहिल्या पानावर "योगावर मालकी कोणाची?" हा मुद्दा घेऊन चर्चा छेडली. त्यामुळे साऱ्या जगाचेच लक्ष याकडे वेधले गेले. पण त्याच्याही वर्षभर आधी या वादाची सुरुवात झाली होती. वाशिंग्टन पोस्टने प्रायोजित केलेल्या ऑनलाईन ब्लॉग वरून एचएएफचे शुक्ला आणि आधुनिक गुरु दीपक चोप्रा यांच्यात हे युद्ध खेळले गेले. शुक्लांची तक्रार होती की हिंदू पद्धती आणि कल्पना यांच्या आधाराने धंदा करत असताना चोप्रा 'हिंदू' हा शब्द टाळत आहेत. कारण चोप्रा स्वत:ला हिंदू ऐवजी 'अद्वैत वेदांती' असे संबोधतात. चोप्रांनी जाहीर केले की हिंदुत्वाकडे काही योगाचे पेटंट नाही. योगाचा जन्म 'जाणीवेत आणि फक्त जाणीवेत' हिंदुत्वाच्या कितीतरी आधी झालेला आहे, ब्रेड आणि वाईन एशु ख्रिस्ताच्या 'लास्ट सपर'च्याही आधीपासून अस्तित्वात होते. त्यामुळे 'ब्रेड आणि वाईन'वर ख्रिश्चनांचा जितका दावा आहे तेवढाच हिंदूंचा 'योगा'वर आहे. शुक्लानी त्यांना हिंदू वारश्याचा आदर न करणारा 'नफेखोर तत्वज्ञानी' म्हणून हिणवले तर चोप्रांनी त्यांच्यावर 'हिंदू मूलतत्ववादी' असल्याचा आरोप केला.

**ना अनादी ना वैदिक**

हा संपूर्ण वाद हिंदू इतिहासाच्या दोन सारख्याच मूलतत्ववादी दृष्टीकोनांचे दर्शन घडवितो. 21व्या शतकातील योग पद्धतीला जवळजवळ 2000 वर्षांपूर्वीच्या 'योग-सूत्रां'शी जोडायचे आणि त्या दोन्हीची सांगड 5000 वर्षांपूर्वीच्या 'वेदां'शी घालायची हे या मांडणीचे अधोरेखित उद्दिष्ट आहे. दोन्हीतील फरक फक्त एवढाच आहे की दीपक चोप्रा *योग हिंदुत्वाच्याही अगोदर अस्तित्वात होता* असे म्हणत आहेत तर शुक्ला आणि एचएएफ *संपूर्ण पाच हजार वर्षांचा वापर*

हिंदुत्वाच्या गौरवासाठी करत आहेत. चोप्रांच्या मते योग हा 'पूर्वेकडील अमर्याद विद्वत्तेचा' भाग आहे. तर 'योग आणि वेद यात भेदच नाही ते अनादी काळापासून एकरूप आहेत' असे एचएएफचे मत आहे.

पण वस्तुस्थिती ही आहे की, आज ज्याला 'योगा' म्हटले जाते ते अनादी काळापासून चालत आलेले नाही किंवा 'वेदा'च्या अथवा 'योगसूत्रां'च्या समानार्थीही नाही. उलट, आधुनिक योगाचा जन्मच मुळी 19व्या शतकाच्या शेवटी आणि 20व्या शतकाच्या प्रारंभी झाला. हे हिंदू प्रबोधन काळाचे आणि भारतीय राष्ट्रवादाचे अपत्य आहे. ज्यात विज्ञान, उत्क्रांती, सुप्रजननशास्त्र, आरोग्य आणि शारीरिक तंदुरुस्ती या बद्दलच्या पाश्चिमात्य कल्पनांनी 'मातृ परंपरा' म्हणून कळीची भूमिका पार पाडली. या काळात वेगवेगळ्या स्तरांवर प्रचंड सरमिसळ झाली, योग आणि तंत्राचे सुलभीकरण झाले. मूळच्या अमेरिकेतील पण भारतात प्रस्थापित झालेल्या थियासॉफिकल सोसायटीने 'अध्यात्मिक विज्ञाना'च्या कल्पना भारतात प्रस्तावित केल्या आणि त्या सर्व कल्पना योगात अंतर्भूत करण्याचे काम योग प्रबोधनाचे नेतृत्व करणाऱ्या स्वामी विवेकानंदानी केले.

परिणामी योगाचा जो शारीरिक कंगोरा होता त्याची सरमिसळ कवायत, जिम्नॅस्टिक्स आणि शरीर सौष्ठवाची तंत्रे यात होऊन त्याचा प्रचार स्वीडन, डेन्मार्क, ब्रिटन आणि इतर अनेक पाश्चिमात्य देशात झाला. हीच योगपद्धती 5000 वर्षांपासून चालत आलेली आहे हे ठसविण्यासाठी या नवीन बदलांवर सृजनशीलपणे योगसूत्रांचे आरोपण करण्यात आले, ज्या योगसूत्रांचे नेमके वर्णन ऑस्ट्रीयात जन्मलेल्या अघेहानंद भारती या हिंदू तांत्रिकाने, "ज्या लोकांनी ब्राम्हणी तत्वे स्वीकारली आहेत त्यांच्यासाठी बनविलेली सूत्रे" असे केले आहे. एचएएफचा आजचा आग्रह म्हणजे 20व्या शतकात जोरकसपणे चालविल्या गेलेल्या चुकीच्या जाहिरातबाजीच्या मोहिमेचा एक भाग आहे.

जरी ही समजूत सर्वदूर पसरवली गेली असली तरी आज हे आधुनिक गुरु जी आसने शिकवितात त्यापैकी बहुसंख्य आसने प्राचीन शिकवणीत कोठेच आढळत नाहीत. प्रचंड कर्मकांडी स्वरूपाच्या यज्ञाभिमुख असणाऱ्या वेदांना पातजंलीच्या शुद्ध जाणिवानुभवाच्या शोधाशी काहीच घेणे-देणे नव्हते. आणि खरोखरच, ज्या 195 सूत्रांनी योगसूत्र बनले आहे त्यापैकी फक्त तीन छोटी सूत्रे पतंजलीनी आसनांसाठी घेतलेली आहेत. महाभारतात योगाचा उल्लेख 900 वेळा आहे. पण आसनांचा मात्र फक्त दोन वेळा आहे आणि भगवद्गीतेत तर अजिबातच नाही.

योगाच्या आसनकेंद्रित, हठयोग अशा पद्धती अर्थातच आहेत. पण त्याचे प्रणेते आहेत ते जटाधारी, राख फासलेले साधू. ज्यांना एचएएफ पाश्चिमात्यांच्या कल्पनेच्या बाहेर ठेऊ इच्छिते. खरेतर हिंदू परंपरेत या शारीरिक योगाच्या पेटंटवर जर कोणाचा हक्क असेल तर तो या जात धुडकावणाऱ्या, गांजेकस, लैंगिक मुक्ताचारी असणाऱ्या, शिव आणि शक्तीला जादूटोण्यासाठी पुजणाऱ्या, रसायनांची किमया साधणाऱ्या आणि लोहार, कुंभार यांच्यासारखे कौशल्य असलेले जटाधारी व राख फासणाऱ्यांचा! त्यांना काही या भौतिक जगाचा कायापालट करायचा नव्हता. त्यांना आपल्या शरीरावर आणि या भौतिक जगावर ताबा मिळविण्यासाठी जादूई शक्ति "सिद्धी" प्राप्त करून घ्यायच्या होत्या. म्हणूनच त्यांनी इतके सगळे कष्ट, त्रास सोसले, खडतर जीवन स्वीकारले.

### मैसूरच्या राजवाड्यातील रहस्य

काही ऐतिहासिक दस्तऐवज आणि तोंडी इतिहासाच्या सहाय्याने केलेल्या नवीन संशोधनाच्या प्रकाशात पट्टाभी जोईस आणि अय्यंगार योगाच्या 'अष्टांग विन्यासाचा' सांधा प्राचीनतेशी कितपत आहे याबाबत शंका निर्माण झाली आहे. जोईस (1915-2009) आणि बी.के.एस. अय्यंगार (1918-2014) या दोघांनीही योगाचे शिक्षण मैसूरचे महाराजा कृष्णराज वडेयर चौथा (1984-1940) यांच्या कारकिर्दीत टी. कृष्णम्माचार्य यांच्याकडून घेतले.

हा महाराजा मैसूरच्या गादीवर 1902पासून त्याच्या मृत्यूपर्यंत होता. त्याच्या कारकिर्दीत त्याने भारतीय सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रम बऱ्यापैकी राबविले आणि त्याचबरोबर पश्चिमेकडील काही सकारात्मक कल्पनाही आपल्या सामाजिक कार्यक्रमात समाविष्ट केल्या. शारीरिक शिक्षणाच्या बाबतीत तो खूपच आग्रही होता. त्याच्या कारकिर्दीत शारीरिक शिक्षणाच्या संदर्भात मैसूर हे देशातील एक प्रमुख केंद्र बनले. आपल्या तरूण राजकुमारीला 'योगा'चे शिक्षण

देण्यासाठी त्यांनी कृष्णम्माचार्य यांना बोलावले तसेच त्यांनी कृष्णम्माचार्य व त्यांच्या सहकाऱ्याना देशभरात फिरून योग प्रात्यक्षिके दाखविण्यासाठी आणि त्या आधारे योग पुनर्जीवित करून लोकप्रिय करण्यासाठी निधीही उपलब्ध करून दिला.

मैसूरच्या राजघराण्याला पूर्वीपासूनच हठ्योगात रुची होती. वडेयर चौथे यांचे पूर्वज मुम्माडी कृष्णराजा वडेयर तिसरे, (1799-1868) यांनी *श्रीतत्त्वनिधी* नावाचे अतिशय सुंदर चित्रमय पुस्तक लिहिले. त्याचा शोध 1980सालच्या मध्यास नॉर्मन जोमान नावाच्या एका स्वीडिश योग विद्यार्थ्याला मैसूर राजवाड्याच्या ग्रंथालयात लागला. या पुस्तकाचे वैशिष्ट्य हे होते की, यात हठयोगाच्या आसनांचा मेळ भारतीय मल्ल जे व्यायामप्रकार व्यायामशाळेत करीत त्याच्याशी घातला होता. हे नाविन्यपूर्ण होते.

अमेरिकास्थित अभ्यासक जोमान आणि मार्क सिंगल्टन या दोघांनीही 1930 च्या सुमारास म्हणजे मैसूर राजवाड्याच्या भरभराटीच्या काळात, जे राजवाड्याशी व राजघराण्याशी संबंधित होते त्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्या मते आधुनिक योगाचे बीज या *श्रीतत्त्वनिधी* सारख्या नाविन्यपूर्ण पुस्तकात आहे. कृष्णम्माचार्य हेही या पुस्तकाशी परिचित होते. त्यांनीही आपल्या पुस्तकात *श्रीतत्त्वनिधी* कडून प्रेरणा घेत पूर्वीच झालेल्या पारंपारिक भारतीय कुस्ती, कवायती आणि हठयोगी आसनाच्या सरमिसळीत विविध पाश्चिमात्य जिम्नॅस्टिक्स आणि कवायती यांचा मेळ घालत *श्रीतत्त्वनिधी* चा हा नाविन्यपूर्ण वारसा पुढे चालविला.

कृष्णम्माचार्य ह्यांना मैसूर राजवाड्यातील पाश्चिमात्य पद्धतीच्या व्यायामविद्येच्या (gymnastics) हॉलमध्ये मुक्त प्रवेश होता. त्यांनी आपल्या दैनंदिन योगामध्ये तेथील वालरोप्स आणि इतर व्यायामासठीची साधनं वापरायला सुरुवात केली. कृष्णम्माचार्यांना पाश्चिमात्य व्यायामविद्येवरील पुस्तके उपलब्ध होती. या पुस्तकातूनच त्यांनी व्यायामविद्येची अनेक तंत्रे अवगत करून घेतली व ती त्यांच्या शिकवणीत उतरली, जी पुढे जोईस आणि बी.के.एस. अय्यंगार यांनी पुढे नेली, असे जोमानचे म्हणणे आहे. उदाहरणार्थ, मांडी घालून केलेले जंपबॅक (jumpback), कमान करणे वगैरे 20व्या शतकाच्या सुरुवातीच्या वर्षात नेल्स बख (Niels Bukh 1880-1950) या डेन्मार्कच्या जिम्नास्टने कोणत्याही साधनांशिवाय करण्यात येणारी स्वीडिश कवायत आणि दैनंदिन जिम्नॅस्टिक्स विकसित केले. ब्रिटीशानी भारतात ती पद्धत प्रस्तावित केली आणि वायएमसीएने ती लोकप्रिय केली. सिंगल्टनचा असा दावा आहे कि, "बखच्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीतील जवळ जवळ 28 प्रकारांची पद्धत आणि पट्टाभी जोईस यांच्या अष्टांगयोगातील किंवा बी.के.एस. अय्यंगार यांच्या लाईट ऑन योगातील प्रकारांची पद्धत जवळ जवळ सारखीच आहे." ही सांधेजोड सांगताना सिंगल्टन म्हणतो, "जिम्नॅस्टिक्स पद्धतीची आसने आणि पारंपारिक पातंजली पद्धत यांच्या आधुनिक सांधेजोडी मागील प्रमुख सूत्रधार कृष्णम्माचार्यच!"

**मग आता योगाची मालकी कोणाकडे?**

आज आपल्याला माहित असलेला 'योगा' म्हणजे प्रचंड प्रमाणावर झालेली सरमिसळ आहे. त्यामुळे "पाश्चिमात्यांनी योगाची चोरी केली" ह्या एचएएफच्या कर्कश आरडाओरड्याला काहीच अर्थ उरत नाही. आजच्या काळातला योग हे एक असे जागतिक पातळीवरील वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण आहे की ज्यात पूर्वेकडच्या आणि पश्चिमेकडच्या पद्धती संपूर्ण जगभरासाठी एक मूल्यवान आणि जपून ठेवावी अशी निर्मिती करण्यासाठी एकत्र आल्या आहेत.

हिंदुत्ववाद भले प्राचीन, मध्ययुगीन अथवा आधुनिक असो पण त्याला योगावर दावा सांगता येणार नाही. तशी बढाई मारणे हे केवळ उद्धटपणाचे नाही तर निखालस खोटेही आहे.

अनुवाद: *राजीव देशपांडे*

•••

# विवेकी विचारांची मुस्कटदाबी

*प्रभाकर नानावटी*

चिकित्सा....राजकारण....समाज

पुरोगामी विचारांसाठी वाहिलेले *दि न्यू रिपब्लिक* हे अमेरिकन मासिक 1915 पासून प्रसिद्ध होत आहे. त्याच्या पहिल्या अंकात या प्रकारच्या मासिकाची समाजाला का गरज आहे याबद्दल संपादकाने *या काळात आपल्याला सर्वनाशापासून वाचवण्याची, आपल्या दुःखावर फुंकर घलण्याची, आपल्याला संरक्षण देणारी शक्ती फक्त सुस्पष्ट विचारांना आहे* असा उल्लेख केला होता. खरे पाहता यात अतिशयोक्ती नाही. काही जणांना स्पष्ट विचांराऐवजी भावनेला प्रतिसाद देणारे विचार आवडत असतील तर काहींना निर्मळ विचारांऐवजी पारंपरिक वा आज्ञासूचक विचार आवडत असतील. काही जण तर विचार करण्याऐवजी भावनेच्या आहारी जात कृती प्रवण होण्याच्या पावित्र्यात असतात. मग ही भावना वैयक्तिक स्वरूपाची असो की सामूहिक स्वरूपाची, त्यांना यात काही फरक करावासा वाटत नाही. पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांनासुद्धा वैचारिक पुस्तके वाचण्यास सांगितल्यावर *आम्ही विचार करत नाही, आम्ही फील्ड वर्कर, इंटेलेक्च्युअल नाही* असे अभिमानाने सांगत असतात.

सामान्यपणे विचार करणारे म्हणजे कुणी तरी जगावेगळे, समाजाशी फटकून वागणारे अशी समजूत समाजमानसात घर करून बसलेली आहे. कदाचित सामान्यांच्या आकलनात थोडे फार तथ्यही असेल. परंतु या समजुतीला कुठलाही तार्किक आधार नाही. विचारवंताच्याबद्दलची ही समजूत सामान्यांच्या कष्ट काळातील अनुभवातून आलेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही. कष्ट माणसांना सावध राहण्याचे शिकवते, परंतु त्यातून शहाणपण येईलच याची खात्री देता येत नाही. आपला समाज, आपला देश शहाण्यांचा नसला तरी चालेल, परंतु तो मूर्खांचा व अडाण्यांचा तरी असू नये येवढीच माफक इच्छा.

आपल्यापुढे मानवजातीला शहाणा करण्याचा उद्देश नसून शहाण्यामध्ये मानवीयता आणण्याचा उद्देश आहे. यासाठी सांस्कृतिक दबावाखाली वावरत असलेल्या विवेकी विचारांचे पुनर्घटन करावे लागेल. खरे पाहता विवेकाचा प्रवास काटेरी मार्गातूनच जात असतो. व त्याचे यश कधीच अंतिम नसते. सर्वांना अत्यंत प्रिय असलेले अविवेकी विचार व अविवेकी कृती विवेकाला घेरलेले आहेत. परंतु हा विवेक अभेद्य आहे. अंधारातील मिणमिणता दिवा आहे, सर्व दोषारोप सहन करणारा आहे, अपयशांचा मानकरी आहे, व दरवेळी अंगावरील माती झटकून पुन्हा वर उठणारा लढाऊ आहे. हे जग खरोखरच विवेकी विचाराने चालत असेल तर विचारांची आवश्यकता भासली नसती. विवेकापासून मुक्ती मिळण्यासाठी भावना आहेत. परंतु भावनेपासून मुक्ती मिळण्याची काही सोय आहे का?

सर्वात महत्वाचे म्हणजे विवेकाला वाद – प्रतिवाद यांचे वावडे नाही. म्हणूनच आधुनिक विचार आणि प्राचीन विचार यांच्यात चर्वितचर्वण होत होत त्यातून नव्या विचाराचा जन्म होतो. ही प्रक्रिया कधीच थांबत नाही. ही प्रक्रिया विज्ञानात प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे विज्ञान कधीच थांबत नाही. विचारांना आक्षेप, आक्षेपाविषयी चर्चा व त्यातून नवे काही तरी हे नेहमीच घडत जाणारी प्रक्रिया आहे. याच विचार प्रक्रियेतून सत्य काय व असत्य काय याचा शोध घेत घेत बुद्धीविषयक विकास होत असतो. या सर्व गोष्टी मनाशी निगडित असतात. यात कुठेही भावनेला प्राधान्य नसते. विवेकी विचारांसाठी खुले मन हवे. खुले मन म्हणजे रिक्त मन नव्हे! काहींना विवेकी विचार भीती निर्माण करतात म्हणून अशा विचारांना ते थारा देत नाहीत. परंतु याउलट अविवेकी विचाराइतके भीतीयुक्त काहीच नसते.

या संदर्भात विवेकांचा व्यवहारातील उपयोग म्हणजे विशेषज्ञांची विधानं. *विशेषज्ञांना शरण जा सगळी काम बिनबोभाट होतील* यावर विश्वास. विशेषज्ञ म्हणचे कोण वा विशेषज्ञता म्हणजे नेमके काय याबद्दल अजूनही गोंधळ आहे. विशेषज्ञांचे आपापसातच एकमेकाशी पटत नसते. काही जण, आपले अभ्यासपूर्वक अभिप्राय देत असतीलही. परंतु

काही वेळा त्यांचे अभिप्राय तर्काच्या कसोटीस उतरत नाहीत. वैज्ञानिकरित्या सिद्ध होत नाहीत. त्यामुळे त्यांच्या अभिप्रायात काही काळे बेरे असण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच जितके विशेषज्ञ असतात त्याच्या दहा पटीत स्यूडो विशेषज्ञ असतात. परंतु विज्ञान क्षेत्रातील वा सामाजिक - आर्थिक विकास क्षेत्रातील विशेषज्ञांच्या आचार-विचार वा कृतीमुळे सामान्य माणसांना निर्णय घेण्यास फार काही उपयोग होत आहे, असे वाटत नाही. तरीसुद्धा आपल्यासारख्यांना – जे अर्थतज्ञ नाही, वा जीवशास्त्रज्ञ नाही, वा हवामानतज्ञ नाही – कुठली तरी बाजू घेणे आवश्यक ठरते. हीच बाजू का घेत आहोत याची किंचितशी कल्पना नसतानासुद्धा बाजू घेणे भाग पडते.

हीच स्थिती आपल्यावर कुणाचे प्रभुत्व असावे यासंबंधातही होऊ शकतो. मुळात आपल्याला अशी निवड करण्याचे अधिकार कुणी दिले हेच माहित नसते. तरीसुद्धा आपला समाज या निवड प्रक्रियेत हिरिरीने भाग घेत असतो. आपली निवड अत्यंत योग्य आहे असेच प्रारंभीच्या काळात वाटत असते. परंतु नंतर वर्चस्वाचा अतिरेक होतो किंवा अपेक्षाभंग होऊ लागतो, तेव्हा आपली चूक लक्षात येते. परंतु वेळ निघून गेलेली असते. सत्तेवर असलेले कितीही मगरूरीने वागले तरी आपण काहीही करू शकत नाही, ही खंत टोचू लागते. म्हणूनच कधी तरी या प्रश्नाच्या उत्तराचा शोध घेणे गरजेचे ठरते.

कदाचित असाच प्रश्न जीवनासाठी कला की कलेसाठी जीवन या वादविवादातही उपस्थित झाला असेल. कलेची बाजू घेणारे जीवनाचे ध्येय कलेसाठी व मार्क्सिस्ट मात्र जीवनासाठी कला असे वाद घालत असतात. रस्त्यावरच्या उपाशी माणसाला समोर असलेल्या भव्य-दिव्य कलाकृतीपेक्षा भाकरीचे दोन घास महत्वाचे वाटतात. तरीसुद्धा माणूस हा केवळ पोटाची खळगी भरणारा प्राणी नव्हे, हे आदिमानवाच्या काळापासून सिद्ध झालेले वास्तव आहे. हेच जर खरे असल्यास कलाप्रकार सामान्यातल्या सामान्य माणसातसुद्धा त्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे बुद्धीच्या पातळीत वाढ करण्यास उद्युक्त ठरत असेल. म्हणजे हे एका प्रकारे बुद्धिमत्तेचे लोकशाहीकरणच! त्यामुळे विचार हे मोठमोठ्या विचारवंतांची मक्तेदारीचा विषय न होता त्यातून क्रियाशील बुद्धीवंतांची निपज होऊ शकेल असे म्हणता येईल. परंतु क्रियाशील बुद्धिवंत हे वास्तव असेल की भ्रम?

लोकशाही सामान्य माणसावर बौद्धिक जबाबदारीचे ओझे लादत असते. समाजातली माणसं ज्या प्रकारे विचार करतात त्यानुसार सामाजिक व्यवस्था आकार घेत असते. ही व्यवस्था अत्यंत धोक्याचेही असू शकते किंवा रोमांचकारीसुद्धा! मुळात लोकशाहीत अविचारी नागरिकांचे बहुमत असल्यास ते धोकादायक ठरू शकतात. कारण याच लोकामधून त्यांच्यावर प्रभुत्व गाजविणारा नेता निवडला जातो. नेत्याचे छक्के पंजे कळण्याइतके लोक निर्बुद्ध असतील तर नेतृत्व कुठल्याही थरापर्यंत जाऊन लोकांचा छळ करू शकते. व आपला छळ होत आहे हेच त्यांना समजत नाही. नेत्याची लोकप्रियता तशीच टिकून राहते. लोकप्रियतेला बुद्धीमत्ता केव्हाही अडथळा आणत असते, कारण लोकप्रियतेला कुणीतरी विचार करतात याचाच तिटकारा असतो. त्यामुळे अविचारीपणा हा स्यूडो लोकशाहीचे लक्षण ठरू शकते. संकुचितवृत्ती व पूर्वग्रहदूषित दृष्टी लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्यांना त्यांच्या मूल्यापासून दूर सारतात.

पूर्वग्रहदूषित विचार व श्रद्धा विवेकीविचाराला मारक ठरणारे महत्वाचे घटक. त्यामुळे अविवेकी विचार करणाऱ्याच्या हातात सत्ता एकवटल्यास त्यांच्या निर्णयाचे, ध्येय धोरणांचे बरे वाईट परिणाम समाजावर नक्कीच होत राहणार. प्रत्येक वेळी समाजाचे भले होत राहील याची खात्री देता येत नाही. व त्यांच्या ध्येयधोरणात चांगुलपणाचा अंश असेलच याचीही खात्री देता येत नाही. चांगुलपणा बाहेरून लादता येत नाही की त्याची सक्तीसुद्धा करता येत नाही.

चांगुलपणावर आधारलेल्या विवेकी विचाराच्या वाटेत येणारा फार मोठा अडसर श्रद्धा असू शकते, मग ती धर्मावरील श्रद्धा असेल, देव वा दैव यांच्यावरील श्रद्धा असेल किंवा एखाद्या तत्वप्रणालीवरील श्रद्धा असेल. श्रद्धा नेहमीच शब्दप्रामाण्य किंवा व्यक्तिप्रामाण्यावर निर्भर असते. व या श्रद्धेची तपासणी करण्यास नेहमीच विरोध केला जातो. त्यामुळे विचाराची कवाडे बंद ठेवावे लागतात. मात्र या श्रद्धेची जबाबदारी सर्वांच्यावर सारख्या प्रमाणात असते. तुम्हाला आवडो न आवडो, श्रद्धेचे दुष्परिणाम सर्वांना भोगावे लागतात. काही वेळा श्रद्धेची भलावण करणारे श्रद्धेतून

मिळणाऱ्या नैतिकतेची ढाल पुढे करून विवेकी विचारांची निष्फळता अधोरेखित करत असतात. परंतु ही नैतिकता अगदीच तकलादू असू शकते. त्यामुळे लोकशाहीला यातून बाहेर कसे काढता येईल? हा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

लोकशाहीतील इतर अनेक घटकांपेक्षा कुठल्याही मुद्यावर तुमचे मत (opinion, vote नव्हे) काय याला फार महत्व असते. कुठल्याही विषयाबद्दल स्वतःचे मत असणे हे नेहमीच शहाणपणाचे द्योतक असते. कारण मत बनवताना विचारांना प्राधान्यता द्यावीच लागते. त्याशिवाय स्वतःचे असे मत होऊ शकत नाही. स्वतःचे असे मत नसणे या उणीवामुळेच धूसर विचार विरुद्ध स्पष्ट विचार अशी विभागणी होत असते. स्वतंत्रपणे विचार करून ठाम मत असणारे स्वतःच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त करून देतात. बदलांना सामोरे जाऊ शकतात. चुका असतील तर सुधारू शकतात. आपल्या कृतीचे, आपल्या परिस्थितीचे विश्लेषण करू शकतात. व अचूक अंदाज करून जीवनात यशस्वी होतात. त्यातून आयुष्याला आकार देतात. याविरुद्ध भावनेच्या भरात वा उत्स्फूर्ततेवर भर देणाऱ्यांचे आयुष्य भरकटत जाते व त्यातून एककल्लीपणा वाढण्याचा धोका असतो. मुळात या प्रकारात स्वतःचे असे मत असत नाही. सर्व काही भाडोत्री असते.

आपण जसे विचार करतो त्याप्रमाणे आपल्यावरील सत्ता कार्यरत होत असते. त्यामुळे स्वतःचे मत असणे व त्याची उघडपणे मांडणी करणे यात काही तरी चुकते असे म्हणता येत नाही. कदाचित इतर तुमच्या मताशी सहमत नसतीलही. खरे पाहता मतभिन्नता असणे हे लोकशाहीच्या जिवंतपणाचे लक्षण ठरू शकते. काही वेळा ही मतभिन्नता वरदान ठरू शकते व काही वेळा जुगारही. गंमत म्हणजे मत ही एक सतत बदलत असणारी मानसिकता असते. जसजशी माहितीत भर पडते तसतसे मत बदलत जाते. काही बनचुके नेते स्वतःकडे मत वळवण्यात निष्णात असतात. आपलेच खरे हे पटवून देण्यात त्यांचा हातखंडा असतो. त्यामुळे मत बनण्याच्या प्रक्रियेला जाहिरातबाजीतून, भावनिक दबावापासून किंवा कुठल्याही पुराव्याच्या अभावी केलेल्या विधानांपासून वा अभिनिवेशापासून दूर ठेवायला हवे. नागरिकांना स्वतःचे मत असणे राजकीय नेत्यांना डोकेदुखीची ठरू शकते. व सत्तेतील लोकप्रतिनिधींना त्यांच्या विरोधात ठाम मतं असणारी जनता असल्यास ध्येय-धोरणं आखण्यात अडचणी येऊ शकतात. गंमत म्हणजे या सत्ताधाऱ्यांना आपण सार्वजनिक मत आपल्याकडे वळवू शकतो याचा फार अभिमान असतो. नेतृत्वाला ती गरजेची वाटत असेल. त्यामुळे विचारांचा सामना विचारांशी न होता भावनेच्या आधारावर मत बदलण्याची प्रक्रिया सुरु होते. व हे सक्षम लोकशाहीला धोकादायक ठरू शकते. त्यासाठी प्रगल्भ व बुद्धीमान – स्मार्ट नव्हे - नेतृत्वाला पर्याय नाही असेच म्हणावे लागेल. केवळ नेतृत्वावरील विश्वास पुरेसे ठरणार नाही. परंतु मत व विश्वास यात काही फरक करता येईल का?

कदाचित विश्वास हे जाणिवपूर्वक बनविलेले मत असे म्हणता येईल. लोकशाहीच्या प्रक्रियेत मतांचे रूपांतर विश्वासात होणे गरजेचे ठरते. जर हा विश्वास नसल्यास पूर्ण व्यवस्था कोलमडून पडते. कुठल्याही मुद्यावर मत बनविण्यापूर्वी त्या मुद्याबद्दलची माहिती, त्यातील तार्किकपणा, त्याची उपयुक्तता, त्याचे बरे वाईट परिणाम इत्यादीं घटकांची तपासणी आवश्यक ठरते. या गोष्टींना थोडासा वेळ लागला तरी आपल्या मताच्या पुष्ठ्यर्थ काही पुरावे आपण सादर करू शकतो. त्यामुळे आपल्या मताला काही वजन असते. परंतु ही प्रक्रिया क्लिष्ट वाटत असल्यामुळे आपण ते नेहमीच टाळत असतो. *तुमच्या अमुक अमुक मताबद्दल* कुणी काही प्रश्न विचारल्यास *हे माझं वैयक्तिक मत आहे* असे म्हणून समोरच्याचे तोंड बंद करतो व वेळ मारून नेतो. काहींना मताच्या पुष्ठ्यर्थ कारणं मागणे हा आगाऊपणा वाटतो, अनादर करणारी ठरते. परंतु आपल्याला एखाद्या व्यक्तिबद्दल आदर आहे याचा अर्थ त्याची मतं आहेत तसे स्वीकारावीत असा होत नाही. त्यामुळे लोकशाहीत राजकीय नेतृत्वाने इतरांच्या बुद्धीमत्तेवर विश्वास ठेवायला हवा. इतरांचे मत लक्षात घेत ध्येय धोरणात बदल करायला हवा. काही वेळा मत ज्ञानातून वा अज्ञानातून बनलेली असल्यामुळे मतामध्ये एकवाक्यता नसते, त्यामुळे गोंधळाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. यातून योग्य रित्या मार्ग काढणे यातच राजकीय

नेतृत्वाचे कौशल्य असते. यात विचारांचा मुकाबला हवा, दडपशाही नको. स्वतःचेच मत योग्य व त्याप्रमाणे इतरांनी वागलेच पाहिजे ही भाषा लोकशाहीला शोभत नाही. भांडण, वैरत्व, सूड या गोष्टी लोकशाहीला धक्का पोचवू शकतात.

काही वेळा एखाद्या विषयात तुमची भावनिक गुंतवणूक असल्यास त्या विषयाच्या इतर अंगांची तपासणीसुद्धा नाकारली जाते. तेव्हा विश्वास श्रद्धेत केव्हा बदलला हेसुद्धा लक्षात येत नाही. खरे पाहता आपल्या मताबद्दल आपण जास्त गंभीर असणे गरजेचे आहे. कुणीतरी काही सांगितले म्हणून वा कुठल्यातरी ऐकीव माहितीवरून पुन्हा पुन्हा मत बदलणे शहाणपणाचे लक्षण नव्हे. कदाचित हे माध्यमामुळेसुद्धा घडत असेल. म्हणूनच लोकशाहीत माध्यमांची जबाबदारी वाढते. आज कुठलेतरी, शहानिशा न करता विधान करायचे व नंतर ते नाकारायचे या धरसोडवृत्तीमुळे लोकशाही प्रक्रियेचे फार मोठे नुकसान होऊ शकते. सार्वजनिक मत तयार करण्यात माध्यमाचा फार मोठा वाटा आहे. व माध्यमाचा बेजबाबदारपणा लोकशाही रुजवण्यात अडथळा ठरू शकते. मुद्दा समजावून देणे, चहू बाजूने त्याची जाण करून देणे, वाचक व वीक्षकांना विचार प्रवण करणे, भावना न भडकावणे, इ.इ. माध्यमांचे कर्तव्य ठरतात. कुणीतरी कर्तव्यच्युत होत असल्यास त्याच्यावर नियंत्रण ठेऊ शकणारी सक्षम यंत्रणा असणे हे लोकशाहीत अपेक्षित असते. काही वेळा माध्यमच बेजबाबदारपणे वागत असतात. त्यांना आपण काय करत आहोत, कशा प्रकारे मांडणी करत आहोत, त्याचे तात्कालिक वा दूरगामी काय परिणाम होऊ शकतात, आपण कशावर लक्ष केंद्रित करत आहोत, विषयातील गौण मुद्दे कुठले - महत्वाचे कुठले, हेच त्यांना कळत नाही की काय असे वाटू लागते. त्यंच्यातील काही अंतर्भूत व मूलभूत मर्यादेमुळे हे शक्य होत नसेलही. आताच्या उदारीकरणाच्या काळात नफेखोरीलाच अग्रक्रम मिळत असल्यामुळे येथे प्रबोधनाला शेवटचा क्रम असतो. त्यामुळे पानभरच्या जाहिरातीच्या भाऊगर्दीत बातम्यांनासुद्धा कुठे तरी कोपऱ्यात चार ओळीसाठी जागा मिळते. परंतु लोकशाही, मानवता, शांतता, अहिंसा यांच्या विरोधात तरी त्यांनी भाष्य करू नये अशी अपेक्षा ठेवण्यात चूक नसावी.

कुठल्याही विषयावर मत बनविताना त्याबद्दल चिकित्सकपणे विचार केलेला असायला हवा. केवळ स्पष्टीकरण देणे वा त्यातील बारीक सारीक गोष्टींचे विवरण देणे पुरेसे ठरत नाही. आपण आपले मत बनविताना एक क्षण असा असतो की तुमच्या जजमेंटवर सर्व काही अवलंबून असते. जजमेंट म्हणजे तुमचेच घोडे दामटण्याची संधी नव्हे. परंतु या प्रकारच्या चिकित्सकपणातून नकारात्मकतेकडे जाण्याचा धोका असतो. त्यामुळे या नकारात्मकते-बद्दलही विचार करणेसुद्धा गरजेचे ठरत आहे. सकारात्मकतेचा उदो उदो करणे वा नकारात्मक विचारातून परिस्थितीला शरण जाणे या दोन्ही टोकाच्या भूमिका टाळणे हितावह ठरतील.

खरे पाहता मतभिन्नता हे निकोप लोकशाहीचे लक्षण आहे. व जी लोकशाही मतभिन्नता अव्हेरते ती लोकशाहीच नव्हे! मतभिन्नतेमुळे विषयासंबंधीचे बरेवाईट गोष्टी लक्षात येतात. दूरगामी परिणाम कळू शकतात. परंतु ही चर्चा वा वादविवाद ध्येय धोरणाला कलाटणी देत असल्यामुळे काहींच्या हितसंबंधाना धक्का लागण्याचा धोका असतो. त्यामुळे काही जण सारासार विचार न करता व लोकशाहीचे निकष न पाळता आपल्या विधानांच्या पुष्ट्यर्थ तावातावाने भांडण्याच्या पावित्र्यात असतात. खरे पाहता टोकाची मांडणी ही मुक्त समाजातील राजकीय विकास व राजकीय तत्वज्ञान यांचे लक्षण आहे. चर्चेच्या ओघात गडबड गोंधळ होणार हे गृहित धरलेले असते. त्यामुळे या भांडणाला समस्या न मानता त्यातून योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

चर्चेच्या दरम्यान होणारी भांडणं लोकशाहीला मारक आहेत का? हा प्रश्न अनेकांना सतावत असतो. खरे पाहता अशा चर्चेत भांडण होणार, सदस्य हातघाईवर येणार. यात विशेष काही नाही. समाजहितासाठी आक्रमकता हवीच. आपल्यापेक्षा वेगळ्या विचाराबद्दल सहनशील असणे तुलनेने सोपे असते. दुर्लक्ष करण्यासाठी फार काही कष्ट घ्यावे लागत नाही. पूर्णपणे तटस्थ राहणे – हे खरोखरच शक्य होत असल्यास – ही अमानवीय कृती ठरू शकते. वैचारिक जबाबदारीत निर्दयपणा विसंगत ठरते, क्रूर ठरू शकते. टोकाची चर्चा वा वादविवाद – काही वेळा न आवडणारी असली तरी – त्यांना पूर्णपणे अव्हेरणे निकोप लोकशाहीला मारक ठरू शकते. उद्दिष्टपूर्तीसाठी कडवटपणा पत्करणे

आवश्यक असते. सुस्पष्ट विचार, संवेदनशीलता व गेंड्याचे कातडी हे नागरिकांचे आयुधं आहेत. सुबुद्ध नागरिकांच्या सर्वसमावेशकतेला याशिवाय पर्याय नाही.

नागरिकांची समावेशकता त्याच्या वैचारिक पातळीवर अवलंबून असते. लोकशाहीत प्रगल्भपणा आणण्यासाठी चिकित्सक असणे गरजेचे ठरते. याचा अर्थ प्रत्येकांनी इतरांपेक्षा एक पाऊल पुढे अशी मानसिकता बाळगावी असे नव्हे. चिकित्सकतेतून व विचारातून तयार झालेली मतं सार्वजनिक व्यवहाराला उपयुक्त ठरतील याचे भान ठेऊनच ती व्यक्त करावीत. त्यात विनाकारण गुप्तता, भीती, वा इतर कुठलेही घटक असू नयेत. लोकशाहीत टोकाच्या शहाणपणापासून टोकाच्या मूर्खपणापर्यंत वेगवेगळ्या छटांची सरमिसळ असते. व हे लक्षात घेऊनच अत्यंत जबाबदारीने आपली मतं मांडणे सूक्त ठरेल.

महत्वाचे म्हणजे लोकशाहीत चांगुलपणा टिकतो यावर सर्वांचा विश्वास हवा. आपल्याला चांगुलपणा कसा टिकतो हे सिद्ध करून दाखवण्याची वेळ येऊ नये. त्याची जाहिरात करण्याची गरज भासू नये. किंवा द्वेष, असहिष्णुता, संशय, भीती, गुप्तता, खोटेपणा या गोष्टींना लोकशाहीत स्थान नाही हे ओरडून सांगण्याची गरज भासणार नाही याची जाणीव सर्वांना हवी. आपल्या भल्यासाठी आपल्या उज्वल भवितव्यासाठी आपण समाजास अहित ठरणाऱ्या गोष्टींचा द्वेष करायला हवा. त्यांच्याबद्दल मनात चीड असायला हवी.

गंमत म्हणजे नागरिकांना आपल्या जाळ्यात ओढण्यासाठी ज्या प्रकारे लोकशाहीतील नेतृत्वाला सामोरे जावे लागते त्याचप्रमाणे बाजारपेठेलाही आपलीच वस्तू विकत घेण्यासाठी ग्राहकांची मानसिकता बदलण्याची गरज भासते. जाहिरातीतून होणारा मारा ग्राहकाचे मत बदलण्यासाठीच असतो. व ही जाहिरातबाजी बाजाराचे हत्यार असते. अगदीच निर्बुद्ध असलेला ग्राहकच जाहिरातबाजीला बळी पडत नाही. खरे काय आहे हे न सांगता केवळ दिखाऊ गोष्टी समोर आणून ग्राहकांचे मन वळवण्याचा व खिसा रिकामा करण्याचा हा प्रयत्न असतो. तसे पाहता राजकीय नेता व सेल्समन यात फार फरक करता येत नाही. कारण दोघेही समोरच्याचे मत बदलण्याच्याच प्रयत्नात असतात. परंतु वस्तूंची जाहिरात व राजकीय नेत्यांच्या भरमसाठ विधानात फरक करता येतो. विक्री व्यवहारातील प्रारूप अनेक गोष्टी गुप्त ठेऊ पाहते. परंतु नेता सार्वजनिक व्यवहारात प्रत्यक्ष भाग घेत असल्यामुळे त्याचा खोटेपणा उघडा पडतो. नागरिकांना अश्या नेत्याला दूर सारता येते. एके काळी राजकारणाकडे बाजारीकरणाचे प्रारूप म्हणून बघितले जात होते. आज मात्र राजकारणातच बाजारीकरणांच्या सर्व गुणविशेषांना समावेश केला जात आहे. सर्व गोष्टींना Event Management चे स्वरूप प्राप्त होत आहे. त्यामुळे ग्राहक म्हणून जी मानसिकता असते तीच मानसिकता नेता निवडीच्या प्रक्रियेत आढळते. चकचकितपणा, भव्य, दिव्य, दिखाऊपणा इत्यादी गोष्टींना भुलून मतदार मतदान करत असतात. त्यात कुठेही विचारांचा अंश वा स्पर्ष नसतो. ब्रँडिंगवरून मतदान होऊ लागते. या ब्रँडिंगसाठी पैशाचा मुबलक वापर केला जातो. आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरली जाते. आताचे इलेक्ट्रॉनिक्स माध्यम काही क्षणात लाखो – करोडो मतदारापर्यंत पोचू शकते. लोकांची मानसिकता पूर्णपणे बदलण्याची ताकद त्यात आहे. विरोधकांचे एकूण एक मुद्दे खोडून काढणे त्यातून शक्य होते. किंवा काही काळ तरी नजरेआड करू शकते. तद्दन खोट्याला खरेपणाचा मुलामा चढविता येते. आश्वासनांची खैरात करता येते. यातून सामान्यजनांच्या विचार शक्तीला कुंठित करण्याच प्रयत्न केला जातो. या माध्यमातून थोडे फार विचार करणाऱ्यांना सहजपणे manipulate करता येते. त्यामुळे खरा-खुरा मतदार अशा जाहिरातबाजींना दूर ठेवण्याच्या प्रयत्नात असतो. मुळात या जाहिरातबाजीत आशयच हरवलेला असतो व बाकी राहतो तो फक्त चोथा!

माध्यमांना काही मूल्ये आहेत की नाही हा प्रश्न विचारावसा वाटतो. बाजारीकरणाच्या प्रवाहात फायदा – व निव्वळ फायदा – हाच अंतिम ध्येय व या क्षेत्रात असलेली जीवघेणी स्पर्धा यामुळे तत्त्व, तात्विक अधिष्ठान, नीतीमत्ता, मूल्ये इत्यादींना गुंडाळून ठेवल्या जातात. तरीसुद्धा समाजात काही बदल घडविण्याचा एक छोटासा प्रयत्न या माध्यमातील काही संवेदनशील व्यक्तींकडून केला जातो, हे नाकारता येत नाही. मुळात माध्यमाच्या तत्त्वज्ञानात बदलत्या

परिस्थितीचा मागोवा घेत घेत पुढे जाण्याला अग्रक्रम दिला जातो. परंतु ज्या विचारामुळे बदल घडत आहेत, त्याचे दूरगामी व तात्कालिक परिणाम काय होतात, याचा नेमका अंदाज न आल्यामुळे किंवा माहित असूनसुद्धा त्याची वाच्यता करायची नाही या प्रवृत्तीमुळे माध्यमांची विश्वासार्हता धोक्यात येत आहे. परंतु खरोखरच एखादा विचार आमूलाग्र परिवर्तन आणू शकतो का  हाही प्रश्न विचारावासा वाटतो. जो बदल दिसतो तो व्यक्तिगत पातळीवर की सामाजिक पातळीवर, याचेही उत्तर आपल्याकडे नाही. काही तज्ज्ञांच्या मते विचारात बदल करण्याची ताकत नाही. विचारांची व्यावहारिकता राजकारण वा समाज  यांच्या पचनी पडणारी नसते. एखादी आशयघन कविता एखाद्या माणसात बदल घडवू शकते. परंतु चळवळीला पुढे नेण्याइतकी शक्ती त्यात नसते.

कुठलाही बौद्धिकतेचा स्पर्श नसलेलेसुद्धा लोकशाहीच्या बौद्धिक वातावरणात वावरत असतात. विचार व कल्पना यांची कमतरता नाही हे प्रत्येकाच्या अनुभवातली गोष्ट आहे. समाजाच्या बुद्धीमत्तेची काळजीसुद्धा एका प्रकारे वातावरणातील बदल याच्याइतकीच संवेदनशील आहे व संवेदनशील राहणार.  जर हा बदल विनाशाकडे नेत नाही ना याचीच धुकधुकी प्रत्येक सुज्ञ व्यक्तीच्या मनात असेल व त्याप्रमाणे आपली पुढील वाटचाल असेल.

pkn.ans@gmail.com

•••

# ठाम आणि निश्चित भूमिका असणारे लेखन

*नागनाथ कोत्तापल्ले*

चिकित्सा....विवेक....समाज

इंग्रजी राजवटीच्या आगमनानंतर भारतीय समाजजीवन क्रमाक्रमाने बदलू लागले. पऱ्यायाने एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकापासून महाराष्ट्रातही बदल सुरू झाले. यातील महत्वाचा बदल म्हणजे भारतीय माणूस मध्ययुगीन सरंजामी मानसिकतेकडून आधुनिकतेकडे येऊ लागला. त्याचे कारणही यंत्रयुगाचे आगमन आणि अर्थव्यवस्थेने घेतलेले भांडवलदारी वळण हे होते. परिणामी आतापर्यंत मूक असणारे समाजघटक जाती घटक मुखर होऊ लागले. ते व्यवस्थेला प्रश्न विचारू लागले. संतांनी जातीमुळे होणाऱ्या कुचंबनेचा निर्देश केला होता. परमेश्वराच्या दृष्टीने कोणी श्रेष्ठ नाही की कोणी कनिष्ठ नाही हे ठासून सांगितले होते. परंतु वास्तव जीवनामध्ये मात्र श्रेष्ठ कनिष्ठ भाव होताच. भगवतभक्त अस्पृश्यांना मंदिरामध्येप्रवेश नव्हताच, ही वस्तुस्थिती होती. साने गुरूजींच्या उपोषणापर्यंत पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश नव्हता.  याचा अर्थ संतांच्या कार्याचे काहीच महत्व नाही, असे मात्र नाही.

इंग्रजी राजवटीबरोबर आधुनिकतेचा प्रारंभ झाला आणि भारतीय माणसाचे मध्ययुगीन मानसिकतेतून हळूहळू सुटका होऊ लागली. ते शिकू लागले. विचार करू लागले. मुख्य म्हणजे प्रश्न विचारू लागले. आतापर्यंत कधीही न विचारले गेलेले प्रश्न ते विचारू लागले. विशेषत: जातीच्या उतरंडीबद्दल प्रश्न विचारू लागले आणि ही उतरंड उद्धवस्त केली पाहिजे असे बोलू लागले. असे मध्ययुगात फारसे झाले नव्हते. म.बसवेश्वर यांचा मात्र अपवाद आहे. त्यांनी जी भूमिका तात्विक पातळीवर घेतली ती त्यांनी प्रत्यक्षातही राबविली. या जातींच्या उतरंडीला संरक्षण देणाऱ्या धर्मसंस्थेला प्रश्न विचारू लागले.  प्राचीन काळात अवैदिक परंपरेने हे केले होते.  हे प्रथमत: घडत होते.

मध्ययुगामध्ये शूद्रातिशूद्र जाती दारिद्र्यामुळे आणि सरंजामी धर्मव्यवस्थेने इतके पिचून गेले होते, की ते धर्मालाच काय, कोणालाच प्रश्न विचारू शकत नव्हते. आता इंग्रजी सत्तेमध्ये ते प्रश्न विचारले जाऊ लागले. म्हणूनच सनातऩ्यांचा आणि देशवासीयांचा सर्वाधिक राग इंग्रजांवर आणि आधुनिकतेवर आहे. म्हणजे आधुनिकतेचे सर्व फायदे आयुष्यात उपभोगायचे आणि मध्ययुगीन मानसिकतेचा देशीवाद सांगायचा अशी ही देशीवाद्यांची रीत आहे. तर मानव मुक्तीचा विचार मांडणारा प्रत्येक माणूस आपला शत्रू आहे, असे सनातनी मानतात. सनातनी आणि देशीवादी

परस्परांना पूरकच आहेत, कारण सनातन्यांना तात्विक बळ देशीवादी पुरवतात, सनातनी कृती करतात. म.गांधींच्या खुनापासून या कृतीला प्रारंभ झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर महाराष्ट्रात सनातनी वृत्तीला आव्हान देणे सुरू झाले. बंगालमध्ये थोडे पूर्वी राजा राममोहन रॉय यांच्या रूपात हे झाले होते. लोकहितवादींच्या पाठोपाठ म.फुले यांनी जाती व्यवस्थेतील कठोर शोषण फार तीव्र शब्दात व्यक्त केले. आणि महाराष्ट्रात एक विचार मंथन सुरू झाले. किंबहुना असे विचार मंथन प्रथमतःच होत होते. या विचार मंथनातून सारा देश ढवळून निघाला. महाराष्ट्र ढवळून निघाला. या विचार मंथनाचा आविष्कार जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात दिसायला लागला. शूद्रातिशूद्रांचे आणि स्त्रियांचे शिक्षण सुरू झाले. त्यांच्या गुलामीविरूद्ध हुंकार उमटायला लागला. साहित्याचे क्षेत्र बदलायला लागले. साहित्यक्षेत्रातील पहिला सशक्त बदल अविष्कृत झाला तो निबंध या गद्य लेखनप्रकारातून. किंबहुना 19व्या शतकातील गद्य लेखन-निबंध लेखन हे मराठी साहित्याचे मोठेच वैभव आहे. या निबंध लेखनाचा परिणाम पुढे क्रमाने साहित्याच्या इतर प्रकारांवर होऊ लागला. किंवा असेही म्हणता येईल की परिवर्तनाचा पहिला वहिला आविष्कार निबंधातून झाला आणि नंतरच इतर साहित्य प्रकार बदलू लागले.

एकंदरीत काय की मराठी गद्याची एक समर्थ परंपरा सुरू झाली. अत्यंत बुद्धिमान आणि मूलगामी विचार करणारी मंडळी लेखनाच्या क्षेत्रात आली. अर्थशास्त्र, समाजशास्त्रांपासून धर्मशास्त्रांतील विसंगतीपर्यंत आपापली मते व्यक्त करू लागली. कडी निकडीचे वाद झडू लागले. मत मतांतरे व्यक्त होऊ लागली. त्यातून महाराष्ट्राची वाटचाल मानवतेच्या दिशेने होऊ लागली. ही प्रक्रिया अजूनही पूर्ण झालेली नाही. ही प्रक्रिया जेव्हा पूर्ण होईल त्या दिवशी महाराष्ट्र आणि आपला देशही सामंती मध्ययुगीन मानसिकतेतून मुक्त होईल. हे घडू नये म्हणून सनातनी आणि देशीवादी देशाचे तोंड पुन्हा एकदा विषमतेच्या दिशेने वळवू पाहात आहेत. असे सगळे घडत असताना त्यांना प्रतिवाद फारसा केला जात नाही. परिणामतः मराठी निबंध क्रमाने निस्तेज होत गेला. मराठी वैचारिक साहित्याची धार बोथट होत गेली. भारतीय स्वातंत्र्यांनंतर तर ते वेगाने घडत गेले. म्हणजे लोकहितवादी-म.फुले यांच्यापासून सुरू झालेले धारदार निबंध लेखन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यापर्यंत येऊन थांबले. यानंतर काही लेखक आहेत, नाही असे नाही. विनोबा भावे, पु.ग.सहस्त्रबुद्धे, श्री.म.माटे, जावडेकर, शरद पाटील, रा.ना.चव्हाण असे काही विचारवंत आणि कृतीशील लेखक आहेत. आणखी काही लेखकांचा निर्देश करता येईल. पण ही यादी फारशी वाढणार नाही. म्हणूनच 1960 नंतर महाराष्ट्राच्या विचारविश्वाला ग्रहण लागले अशी चर्चा सुरू झाली. वाद विवाद थांबले. आज तर महाराष्ट्राच्या विचारविश्वात केवळ बोटावर मोजता येतील एवढेच लोक उरले आहेत. जे निर्भिडपणे आणि ठामपणे जीवनमूल्यांच्या बाजूने बोलणारे आहेत.

स्वातंत्र्यानंतर खरे म्हणजे शिक्षणाचे प्रमाण वाढले. इतर भौतिक सुधारणाही होऊ लागल्या. एका नव्या देशाची घडण व्हावी या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. हे सगळे होताना मात्र विचार विश्वाला वाळवी लागली. खरा प्रश्न असा की, असे का झाले असावे? या प्रश्नाचे नेमके आणि एकच एक उत्तर देणे कठीण आहे. तरीही काही घटनांचा निर्देश करता येईल. स्वातंत्र्य मिळाले आणि म.गांधी यांचा खून झाला. त्यातून देश थोडा सावरतो न सावरतो तोच आणीबाणीसारखी घटना घडली. आणीबाणीमध्ये कार्यकर्ते आणि स्वतंत्र विचार करणाऱ्यांना कैदेत टाकण्यात आले. दमनसत्र सुरू झाले. याचा फायदा घेऊन म.गांधींना मारणाऱ्या शक्ती अधिक उजळ माथ्याने वावरू लागल्या. जनसामर्थ्य धार्मिक भावनेला फुंकर घालून स्थान मिळवू लागल्या. बाबरी मशिदीच्या उद्धस्तीकरणानंतर उसळलेल्या प्रचंड दंगली देशाच्या उरात धडकी भरवून गेल्या. हा प्रवास चालूच आहे, याची खूण म्हणजे दाभोलकर, पानसरे यांचा खून. दरम्यानच्या काळात समदूर हाशमी, शंकर नियोगी, कृष्णा देसाई यासारखे असंख्य कार्यकर्ते संपविण्यात आले. ही यादी आणखीही वाढेल.

असा सगळा भोवतीच्या सामाजिक, राजकीय दहशतवाद असताना या परिस्थितीला येथील बेछूट भांडवलदारी आणि चंगळवादी व्यवस्थेने हातभारच लावला. या व्यवस्थेचा परिणाम असा झाला की, मूठभर लोक संपत्तीधारक झाले, वाटेल तशी चंगळ करू लागले आणि सत्तेपासून शिक्षण, प्रसिद्धी माध्यमांपर्यंत सारेच आपल्या ताब्यातच आले पाहिजे यासाठी धोरणे आखू लागले. मोर्चे बांधणी करू लागले. परिणामत: भारतातील सत्तर टक्के लोकांचे रोजचे उत्पन्न केवळ रू.वीस एवढेच झाले. त्यांना जगण्यासाठी असंख्य कसरती कराव्या लागतात. ग्रामीण भाग तर उद्ध्वस्तच झाला आहे. म्हणजे स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा सामाजिक आणि आर्थिक विषमता होतीच. ती क्रमाने वाढत गेली. विशेषत: 1990 नंतर तर ती कमालीच वाढली. दलित, शोषितांवरील हल्ले वाढले. त्याची बाजू घेऊन बोलणारे कोणी फारसे उरले नाहीत. कारण साधारणत: ज्यांना आपण मध्यमवर्गीय म्हणतो, ते तीव्र स्पर्धेमध्ये सहभागी झाले. आपले करिअर आणि अंतिमत: अमेरिकेत स्थायिक होणे अशी त्यांची स्वप्ने उरली. त्यांचे समाजाशी काही देणेघेणे उरले नाही. समाजाबद्दल विचार का करायचा असे त्यांना वाटू लागले. शिवाय भोवतीचा सारा माहोल चंगळ करण्यात रमलेला. प्रसिद्धी माध्यमे-कुणाची तरी म्हणजे भांडवलदारांची अगर सत्ताधाऱ्यांच्या मालकीची झालेली. यातून समाजामध्ये एकीकडे तीव्र नैराश्य तर दुसरीकडे स्वयंकेंद्रितता तसेच तुच्छताही विकसित झाली. विचार करणे, विशेषत: समाजाबद्दल विचार करणे वेडेपणाचे लक्षण वाटू लागले. अशा सगळ्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये विचार करणारे आणि समाजासाठी विचार करणारे फार थोडे लोक उरले. शरद पाटलांसारखे काही लोक कालवश झाले.

तेव्हा एक प्रश्न उपस्थित होतो की, समाजासाठी व्यापक विचार करणाऱ्या व्यक्तींना कुठलेच संरक्षण उरले नाही. तसेच सहानुभूतीदारही फारसे उरले नाहीत. ते जगण्याच्या स्पर्धेत उतरले. अशा परिस्थितीत व्यापक समाज हिताचा विचार करणारे लेखन कसे विकसित होईल? अर्थात समाजासाठी व्यापक विचार करणाऱ्यांना तसे कधीच संरक्षण नव्हते. म.फुले आणि आगरकर यांना कुठले संरक्षण होते? पण सहानुभुतीदार मात्र होते. अर्थात या दोघांनाही किती यातना सहन कराव्या लागल्या ते पुन्हा सांगण्याची गरज नाही. आज प्रतिकूल परिस्थिती अधिकच वाढलेली दिसते. अशा परिस्थितीत व्यापक सामाजिक हिताचा विचार करण्यासाठी ठाम भूमिका लागते. जातीपुरता विचार करणाण्यांसाठी याची गरज नसते. उलट देशीवादी म्हणून प्रतिष्ठा मिळते. ते निर्भयपणे मांडण्याची हिंमत लागते. वाट्याला विपरितच येणार आहे, याची तयारी ठेवावी लागते. या सगळ्या गोष्टी तर हव्यातच पण निश्चित अशी भूमिका असणे आवश्यक असते. भूमिका नसणारी माणसे केवळ वर्णनाच्या किंवा वृत्तांकनाच्या पातळीवरच थांबत असतात. भूमिका असणारी माणसे त्यापुढे जातात. तर्काधिष्ठित अशी कारणमीमांसा देऊ शकतात. त्यासाठी अर्थातच बौद्धिक सामर्थ्यही हवे असते. याचा अर्थ असा की, कुठल्या तरी विचारांची किंवा तत्वज्ञानाची बैठक तुमच्या व्यक्तिमत्वाला असणे गरजेचे असते. म्हणजे तुम्ही नेमके कोण आहात ते स्पष्टपणे पुढे आले पाहिजे. आणि येथेच लोक घाबरतात. कारण त्यांना काही लाभांपासून त्यांना वंचित व्हावे लागते. किंवा काही धोके पत्करावे लागतात. म्हणजे समर्थ वैचारिक लेखनासाठी ठाम अशी भूमिका हवी असते. ती जाहीर करण्याची तयारीही पाहिजे असते.

मराठी साहित्यातील बहुसंख्य लेखक आणि साहित्यिक आपल्याला अशा भूमिकेची गरजच नाही, असे घोषित करण्यात धन्यता मानतात. याचा अर्थ असा की, अशी निश्चित दृष्टी असणे, भूमिका असणे म्हणजेच 'अन्वेषण दृष्टी' असणे गरजेचे असते. आणि त्या आधारे समोरच्या घटितांचा अर्थ लावण्याची तयारी असणेही आवश्यक असते. किंबहुना त्यामुळेच तुमचे लेखन वृत्तांकनाच्या पुढे जात असते. प्रश्नाच्या गाभ्यापर्यंत जात असते. जशी अन्वेषण दृष्टी महत्वाची त्याप्रमाणेच हेतुची स्पष्टताही महत्वाची असते. म्हणजे आपण कशासाठी लिहित आहोत त्याची स्पष्टता निदान वैचारिक लेखन करणाऱ्या लेखकाकडे तरी असलीच पाहिजे. म्हणजे स्वत:साठी लिहितो आहोत की केवळ आपल्या धर्मापुरते लिहितो आहोत की जातीपुरते इत्यादी. असा मर्यादित हेतू वैचारिक स्वरूपाच्या लेखनाला विकसित होऊ देत नाही. त्यासाठी एकूण मानव जात जर लेखकाच्या दृष्टीसमोर असेल तर ते खऱ्या अर्थाने वैचारिक स्वरूपाचे लेखन असते. म्हणूनच म.फुले असोत की, डॉ.आंबेडकर असोत, त्यांनी कधीही कुठल्या जातीच्या विरोधात लिहिले

नाही. त्यांनी व्यवस्थेचे विच्छेदन केले, आणि म्हणूनच ते व्यापक झाले. मूलगामी झाले. एकूण मानव जातीचा विचार करणारे झाले.

याचा अर्थ असा की, ज्याच्याजवळ व्यापक समाजहितैषी दृष्टी, भूमिकेचा ठामपणा, त्यानुसारची अन्वेषण दृष्टी असते, त्यालाच वैचारिक स्वरूपाचे लेखन करता येते. शिवाय प्रतिकूल परिस्थितीतही विचार व्यक्त करण्याची निर्भिडताही त्याच्याकडे असली पाहिजे. अर्थात कुठल्याही काळात असे लोक फार थोडेच असतात. चंगळवादी उन्मत भांडवलदारी व्यवस्थेमध्ये त्यांची संख्या खूपच कमी होते.

अतिशय आक्रमक चंगळवादी अर्थव्यवस्थेमुळे समाजातील संघर्ष तीव्र झाले आहेत. त्यामुळे जाती जातींमधील संघर्ष वाढले आहेत. परिणामी सर्वसामान्य लोकांना आपल्या संरक्षणासाठी पुन्हा जातीची कवचे धारण करणे गरजेचे वाटू लागले आहे. म्हणजे आपल्याला जाती नष्ट केल्या पाहिजेत असे वाटते, परंतु व्यवहारात मात्र जाती अधिक घट्ट होत आहेत. कधी काळी जाती आणि व्यवसाय यांचे एक नाते होते. त्यातून शोषणही होत असे. आज यांत्रिकीकरणामुळे आणि समाजात झालेल्या इतर बदलांमुळे हे नाते शिल्लक राहिलेले नाही. तरीही लोक जातींच्या आश्रयाला जात आहेत. आर्थिक अस्थैर्य हे त्याचे कारण आहे. त्यातून जातींच्या संघटनांचा उदय होत आहे. त्यातून जातींचा अभिमानही निर्माण होतो आहे. या अभिमानापोटी अर्थहीन प्रथा परंपरांचेही रक्षण करावे, असे लोकांना वाटत आहे. मौंजी बंधन, जानवे घालणे इ. प्रथांचे समर्थन त्यातूनच होत आहे. बुद्धिवादी दृष्टिकोन आणि परंपरा असा संघर्ष निर्माण झाला आहे. परंतु पारंपरिक मनोवृत्तीचे लोक बुद्धिवादी दृष्टिकोन न स्वीकारता कसे हास्यास्पद वर्तन करीत आहेत.

शोषित जाती शोषणमुक्तीचा एक मार्ग म्हणून जातीच्या छत्राखाली संघटीत होत आहेत, तर उच्चभ्रू जाती आपले वरचे स्थान टिकविण्यासाठी आणि पुन्हा शोषण करण्यासाठी जातींच्या संघटना काढत आहेत, ही वस्तुस्थिती आहे. खरा प्रश्न जाती कशा घालवायच्या हाच आहे. त्या दृष्टीने उत्पादन साधनांवरील मालकी बदलणे हा एक महत्वाचा मार्ग सांगितला आहे. आणकी एक मार्ग डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितला आहे. आणि तो म्हणजे आंतरजातीय विवाहांचा. हा मार्ग निश्चितच महत्वाचा असला तरी अंतिम मार्ग मात्र नाही.

आज आपल्या देशात आणखी एक प्रयत्न सुरू आहे. आणि तो म्हणजे हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचा. त्यासाठी वेगळी राष्ट्रवादाची संकल्पना तयार करावी लागते आणि तीही प्रक्रिया प्रकट-अप्रकटपणे सुरू आहे. परंपराभिमानी काही म्हणत असले तरी आपला देश स्वातंत्र्यापूर्वी महाराष्ट्र नव्हता ही वस्तुस्थिती आहे. राष्ट्रवादाची जाणीव आपल्या लोकांना एकोणिसाव्या शतकात होऊ लागली. त्यासाठी आधार शोधण्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यात प्रामुख्याने दोन प्रकारच्या विचारधारा पुढे आल्या. त्यापैकी एक म्हणजे धर्माधिष्ठित राष्ट्रवादी विचारधारा आणि दुसरी म्हणजे ‘एकमय लोक’ होणे. म.जोतिबा फुले त्यांनी ‘एकमय लोक’ ही अवस्था निर्माण झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने राष्ट्र निर्माण होणार नाही असे म्हटले होते. भारतीय राज्यघटनेनेही स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्‍याय या बाबी केंद्रस्थानी ठेवल्या आहेत. म्हणजे एका अर्थाने ‘एकमय लोक’ व्हावेत अशीच त्यामागे धारणा आहे. परंतु शतकानुशतके धर्माधारे जे शोषण करीत होते, त्यांचा या राष्ट्रवादाला विरोध हवा आहे.

ज्यांना सामाजिक स्थिती गतीचा आणि संघर्षांचा अन्वयार्थ लावायचा असतो, चिंतन करावयाचे असते आणि त्यातून काही मार्ग निघावा असे वाटत असते, त्यांना दोन बाबी कराव्या लागतात. त्यापैकी एक म्हणजे पूर्वपरंपरेतील आपले पूर्वसुरी शोधणे आणि दुसरे म्हणजे परंपरांमधील उदार प्रतिकांचा शोध घेणे. त्यादृष्टीने पंढरपूरचा विठ्ठल हा सर्व जातीजमातींचा देव आहे. वारीच्या निमित्ताने जातीवर मात करण्याची प्रक्रिया घडू शकते, घडते हे त्यांचे म्हणणे मान्य करावेच लागते. शिवाय वारकरी संप्रदायाचे उदारमतवादी तत्वज्ञान प्रकट करणारे विपुल साहित्य आहेच.

परंपरेमध्ये परिवर्तनासाठी उपयुक्त ठरणारी जशी प्रतिके सापडतात, त्याप्रमाणेच पूर्वसुरींपैकी काही महनियांना परिवर्तनवादी आवश्यक असणारी कृती केलेली असते. तसेच काही चिंतनही केलेले असते. म्हणजे त्यांनी काही

पाऊलवाटही आखलेली असते. या दृष्टीने म.फुले, रा.शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी केलेले कार्य आणि चिंतन अतिशय मूलगामी आहे. किंबहुना परिवर्तनाच्या चळवळींची बैठकच तयार झालेली आहे,

समता प्रस्थापन आणि त्यासाठीचा संघर्ष केंद्रवर्ती सूत्र आहे. जात, धर्म, धर्माधिष्ठीत राष्ट्रवाद, जातीयवादी संघटना इ.साऱ्याच गोष्टी समता निर्माण होऊ देत नाहीत. बंधुतेच्या त्या अडसर होत. म्हणूनच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य प्राप्त झाले असे होत नाही. अंधश्रद्धाही समता निर्मितीच्या आड होणारीच गोष्ट आहे. कारण पुष्कळदा अंधश्रद्धांच्या आडून शोषण केले जाते. शिवाय माणसाला अंधश्रद्धा दुबळ्या बनवतात. बुद्धीचा वापर करू देत नाहीत. तसेच अंधश्रद्धांचा संबंध धर्माशी जोडून त्यांना संरक्षण मिळविले जाते आणि प्रश्न अधिकच गुंतागुंतीचे बनत जातात. या सगळ्यांमधून मार्ग काढण्यासाठी अंधश्रद्धा दूर करणे एवढाच उपाय शिल्लक राहतो. त्यासाठी डॉ.नरेंद्र दाभोलकरांनी आयुष्य वाहिले. शेवटी सनातन्यांनी त्यांना संपविलेच.

*साभारः सुभाष थोरात यांच्या 'वर्तमानाची बखर' या आगामी पुस्तकासाठीच्या प्रस्तावनेचा संपादित भाग*

•••

# मानवी बुद्धी आणि ज्ञान

*य. ना. वालावलकर*

चिकित्सा....समाज....मानसिकता

गीतेच्या तिसऱ्या अध्यायातील बेचाळीसावा श्लोक आहे :
इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्य: परं मन:।
मनसस्तु परा बुद्धि: यो बुद्धेः परतस्तु स: ।(गीता 3.42)
अर्थ: (स्थूल शरीराहून) कर्मेंद्रिये आणि ज्ञानेंद्रिये श्रेष्ठ आहेत. इंद्रियांहून मन श्रेष्ठ आहे. तर मनाहून बुद्धी श्रेष्ठ आहे. आणि बुद्धीच्याही पलीकडे सर्वश्रेष्ठ असा "तो" आहे. इथे तो या सर्वनामाच्या ठिकाणी आत्मा अभिप्रेत आहे.

या श्लोकात श्रेष्ठतेची जी चढती भाजणी दिली आहे ती अचूक आहे. इंद्रियांवर मनाचे नियंत्रण असायला हवे. तसेच मनावर बुद्धीचे. बुद्धीच्या पलीकडे असलेला आत्मा हा बुद्धीहून श्रेष्ठ आहे असे म्हटले आहे. मनाचे अधिष्ठान मेंदू आहे. म्हणजे सर्व भाव-भावनांचा उद्गम मेंदूत होतो. तसेच मानवी बुद्धीसुद्धा मेंदूतून उद्भवते. म्हणून बुद्धीहून श्रेष्ठ मेंदू आहे. उपनिषदांत तसेच गीतेत त्यालाच आत्मा म्हटले असावे. कारण त्याकाळी मेंदू आणि त्याचे कार्य या विषयीचे कोणतेच ज्ञान माणसाला नव्हते. पण अद्भुत कार्य करणारी काही यंत्रणा शरीरात आहे असे त्या ऋषींना वाटत होते. म्हणून त्यांनी हृदयस्थ आत्म्याची कल्पना केली. पण ती यंत्रणा म्हणजे मानवी मेंदू.

मानवी मेंदू हे अब्जावधी मज्जापेशींपासून बनलेले, अत्यंत गुंतागुंतीचे, व्यामिश्र असे विद्युत-रासायनिक ( इलेक्ट्रो-केमिकल ) यंत्र आहे. मेंदूच्या अनेक क्षमता आहेत. त्यांतील जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती, अपोहन (निरीक्षणांवरून तर्कसुसंगत निष्कर्ष काढण्याची क्षमता), प्रतिभाशक्ती, अंत:स्फुरणशक्ती, आणि विवेकशक्ती या क्षमतांचा समुच्चय म्हणजे मानवी बुद्धी होय. म्हणजे बुद्धीची नऊ अंगे - नऊ घटक - आहेत. सर्वसामान्यपणे प्रत्येक माणसात यांतील पहिले सहा घटक कमी-अधिक प्रमाणात असतात. प्रतिभा, अंत:स्फुरण, आणि विवेक या क्षमता प्रत्येक व्यक्तीत असतीलच असे नाही. मतिमंद व्यक्तीत स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती आणि तर्कशक्ती हे तीनच घटक अल्प प्रमाणात असतात.

बुद्धिद्वारे माणूस ज्ञान प्राप्त करतो. त्यातून तंत्रज्ञानाची निर्मिती होते. माणसांसाठी उपयुक्त साधनांचे उत्पादन होते. त्यामुळे माणसाचे जीवन अधिकाधिक सुख-सुविधापूर्ण, सुकर आणि सुरक्षित होते. तसेच बुद्धीच्या सहाय्याने माणूस नवीन ज्ञान निर्माणसुद्धा करतो. जे समाजाच्या ऐहिक प्रगतीला उपयुक्त ठरते तेच खरे ज्ञान होय. इथे सर्वांगीण प्रगती

विचारात घ्यायला हवी . म्हणजे आर्थिक प्रगती, सांस्कृतिक प्रगती, सामाजिक प्रगती इत्यादि. मानवी ज्ञानाचे चार प्रमुख प्रकार सांगता येतील. ते आहेत:

- अर्जित ज्ञान (माणसाने निसर्गातून प्राप्त केलेले ज्ञान ).
- निर्मित ज्ञान (माणसाने निर्माण केलेले उपयुक्त ज्ञान.)
- भ्रमित ज्ञान (माणसाच्या चुकीच्या संकल्पनांमुळे निर्माण झालेले अज्ञान.)
- भंपक विज्ञान (स्यूडो सायन्स)

आता या चार प्रकारांविषयी थोडक्यात पाहू.

**अर्जित ज्ञान**

म्हणजे प्राप्त केलेले ज्ञान. विशेषत: निसर्ग नियमांचे ज्ञान. मुख्यत्वेकरून जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, स्मरणशक्ती, कल्पनाशक्ती, तर्कशक्ती आणि अपोहन क्षमतांद्वारे हे ज्ञान प्राप्त होते. पृथ्वीवरील चराचर सृष्टीत अनेकविध गोष्टी आहेत. (सजीव प्राणी, निर्जीव वस्तू). त्यांचे गुणधर्म शोधून ते जाणणे. परस्पर संयोगांचे (अभिक्रियांचे) परिणाम शोधून ते जाणणे. सृष्टीत तसेच विश्वात ज्या अनेक नैसर्गिक घटना घडतात त्यासंबंधीचा कार्य-कारण भाव उलगडणे. थोडक्यात म्हणजे निसर्गनियमांचे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे अर्जित ज्ञान संपादन करणे होय.

माणसाची जिज्ञासा आणि निरीक्षणशक्ती यांमुळे त्याच्या डोक्यात अनेक प्रश्न उद्भवतात. पाऊस का पडतो? धरणीकंप का होतात? वादळे कशी निर्माण होतात? अरण्यात वणवा आपोआप लागलेला दिसतो त्याचे कारण काय असावे? सूर्याचे उत्तरायण-दक्षिणायन का होते? सूर्य- चंद्र यांना ग्रहणे का लागतात? थोड्या वेळात ती का सुटतात? ऋतुचक्र का होते? चंद्राच्या कला का दिसतात? अशा अनेक प्रश्नांवर माणसाने सतत विचार केला. या सर्व प्रश्नांची सत्य उत्तरे माणसाला यथाकाल सापडली. त्याला अनेक निसर्गनियमांचे ज्ञान प्राप्त झाले. हे नियम माणसाने निर्माण केलेले नाहीत. ते निसर्गात अस्तित्वात आहेत. त्या नियमांनुसार घटिते घडत असतात. असे निसर्गनियम अनेक आहेत.

झाडावरचे फळ खाली पडताना पाहून न्यूटनची जिज्ञासा जागृत झाली. त्याच्या डोक्यात प्रश्न उद्भवला की फळ खाली का पडते ? तसेच चेंडू वर उंच फेकला तरी थोड्या वेळाने खाली का येतो ? या प्रश्नावर त्याने तर्कशक्तीने विचार केला आणि वैश्विक गुरुत्वाकर्षणाचा नियम प्रकट झाला. माणसाला समजला. ग्रह सूर्याभोवती का फिरतात ते स्पष्ट झाले. ग्रहांच्या गतीचे गणित सुटले.

पाण्याने काठोकाठ भरलेल्या टबात आर्किमेडीज आंघोळीसाठी शिरला. काही पाणी टबाबाहेर सांडले. आर्किमेडीजचे विचारचक्र सुरू झाले. बाहेर सांडलेले पाणी किती असेल ? हीरो राजाच्या मुकुटाविषयींच्या प्रश्नावर तो आधीच विचार करीत होता. त्याला उत्तर सापडले. या संदर्भात त्याने शोधलेल्या तत्त्वांना शालेय पुस्तकात आजही स्थान आहे. माणसाच्या मेंदूतील जिज्ञासा, निरीक्षणशक्ती, तर्कशक्ती, आणि अपोहन (म्हणजे तर्कशुद्ध निष्कर्ष काढण्याची शक्ती), यांद्वारे निसर्गनियम शोधता येतात. निसर्गनियमांचे ज्ञान म्हणजे सत्यज्ञान. गेल्या काही शतकांत जगभरातील अनेक वैज्ञानिकांनी निसर्गनियम शोधले. ते पुन:पुन्हा तपासले. या संशोधित नियमांना वैज्ञानिक तत्त्वे असेही म्हणतात. विविध क्षेत्रांत माणसाचे ज्ञान वाढू लागले.

- वाफेतील ऊर्जेचा शोध लागला. त्यांतून वाफेवर चालणारे इंजीन विकसित झाले. आगगाड्या धावू लागल्या. अथांग महासागरात बोटी चालू लागल्या.
- इंधनाच्या ज्वलनाने ऊर्जा निर्माण होते हे समजले. त्यांतून इंटर्नल कंबश्चन इंजिन आले. दुचाकी, चौचाकी स्वयंचलित वाहने पळू लागली. वाहतूक कितीतरी सुलभ, कितीतरी वेगवान झाली.
- विद्युत् ऊर्जेचा शोध लागला. रात्रीचा अंधार दूर झाला. सुखसोयीची अनेक साधने विकसित झाली. माणसाचे

शारीरीक कष्ट कमी झाले. विजेमुळे निर्माण झालेल्या सुविधांची यादी न संपणारी आहे.

- निसर्गातील सर्व मूलद्रव्ये शोधली. पीरिऑडिक टेबल सिद्ध केले. पदार्थांतील रेणूंची रचना समजली. अणूचे अंतरंग उलगडले. कितीतरी नवनवीन वस्तू ,नवनवीन साधने निर्माण हाली.
- सूक्ष्मदर्शक यंत्रातून जंतू दिसले. अनेक रोगांवर, प्रतिबंधक लसी, प्रभावी परिणामकारक औषधे मिळू लागली. अनेक माणसांचे अकाली मृत्यू टळले.

अशाप्रकारे जगातील वैज्ञानिकांच्या वैयक्तिक तसेच सांघिक प्रयत्नांतून मानवाच्या अर्जित ज्ञानाचे अधिकृत ज्ञानभांडार निर्माण झाले. त्यात प्रत्यही भर पडतच आहे. आपण शाळा-कॉलेजांतून जे ज्ञान म्हणून शिकतो ते या अधिकृत ज्ञानसंग्रहाचा भाग असते. जगभरातील अधिकृत शिक्षण संस्थातून हेच ज्ञान शिकवितात.

या ज्ञानभांडारावर कोणाचा एकाधिकार नाही. ते जगातील सर्वांना विनामूल्य उपलब्ध आहे. हे सत्यज्ञान स्थल-काल-व्यक्ति निरपेक्ष आहे. ते वस्तुनिष्ठ आहे. हे ज्ञान पौर्वात्य, पाश्चिमात्य, औत्तरात्य, दाक्षिणात्य असे नसते. मानवाने प्राप्त केलेले हे ज्ञान सर्वांसाठी असते.

सत्यान्वेषणाची म्हणजे निसर्गनियम शोधण्याची वैज्ञानिक पद्धत संशोधकांनी विकसित केली आहे. ती पूर्णत्वाला पोहोचली नसेल. प्रत्येक गोष्टीत सुधारणा करणे शक्य असते. ती कालौघात घडून येते. ज्ञान वाढत असते. सत्यान्वेषणाची ही (वैज्ञानिक पद्धत) एकमेव विश्वासार्ह पद्धत आहे. सत्यशोधनाचा अन्य कोणताही मार्ग नाही. ध्यान-धारणा-समाधी-साक्षात्कार सद्गुरुने शिष्याच्या डोक्यावर हात ठेवल्याने होणारा शक्तिपात (ज्ञानाचे संक्रमण) असल्या भ्रामक गोष्टींतून सत्यज्ञान प्राप्त होत नसते. अशा मार्गांनी ज्ञान संपादन केल्याचा दावा कोणी मांडला तरी त्या ज्ञानाने वैज्ञानिक निकष पूर्ण केल्याविना त्या ज्ञानाला माणसाच्या अर्जित ज्ञानाच्या अधिकृत भांडारात स्थान मिळत नाही.

माहिती आणि ज्ञान यांतील भेद (फरक) जाणला पाहिजे. ज्ञानाचे आकलन व्हावे लागते. त्यासाठी बुद्धीच्या तर्कशक्तीची आवश्यकता असते. माहिती लक्षात ठेवायची असते. त्याकरिता स्मरणशक्ती चांगली असावी लागते. भूमितीच्या प्रमेयाची सिद्धता एकदा समजून घेतली की स्मरणात ठेवावी लागत नाही. ती केव्हाही लिहिता येते. कारण त्यामागे तर्कसंगती असते. पण "वसईच्या तहाच्या अटी "स्मरणात असतील तरच लिहिता येतील. त्यामागे कोणतेही तर्कशास्त्र नसते. जगातील सर्व देशांच्या राजधान्यांची नांवे कांही मुलांना तोंडपाठ असतात. त्यांची बुद्धी अलौकिक असते असे नाही. घोकंपट्टी केलेली असते, स्मरणशक्ती चांगली असते एवढेच.

"कौन बनेगा करोडपती" सारख्या सामान्य ज्ञानाच्या (जी.के) स्पर्धांत चौफेर वाचनाची आणि स्मरणशक्तीची कसोटी लागते. संपूर्ण बुद्धीची नव्हे. स्मरणशक्ती हे तर बुद्धीचे गौण अंग आहे. तर्कशक्ती आणि अपोहन ही प्रधान अंगे आहेत. या स्पर्धेत तर्कावर आधारित प्रश्न कधी विचारल्याचे ऐकिवात नाही.

इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र हे केवळ माहितीचे विषय आहेत. त्यांत तर्काला फारसा वाव नाही. भाषा विषयातील व्याकरणाचा भाग कांही प्रमाणात तर्काधिष्ठित आहे. अन्य प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास कल्पनाशक्ती आणि प्रतिभाशक्ती यांचा उपयोग होतो. अंकगणित आणि भूमिती हे विषय पूर्णतया तार्किक आहेत. बीजगणितातही तर्कशक्तीचा बराच उपयोग करावा लागतो.

**निर्मित ज्ञान**

माणसाने निसर्गातील नियम शोधून काढून सत्यज्ञान प्राप्त केले. तसेच आपली कल्पनाशक्ती, प्रतिभाशक्ती आणि अंत:स्फुरणशक्ती यांच्या बळावर नवीन ज्ञान निर्माण केले. हे ज्ञान अमूर्त संकल्पनांविषयी आहे तसेच मूर्त संकल्पनांविषयीही आहे. व्याकरणशास्त्र, गणितशास्त्र, अर्थशास्त्र, आदि अमूर्त शास्त्रे आहेत तर नाट्यशास्त्र, शिल्पशास्त्र, संगीतशास्त्र, नृत्यशास्त्र, सूपशास्त्र इत्यादि मूर्त शास्त्रे आहेत. या विषयींचे सर्व ज्ञान हे मानवनिर्मित आहे.

अर्जितज्ञानाप्रमाणे हे ज्ञान सुद्धा नियमबद्ध आहे. गणितशास्त्र सोडले तर अन्य शास्त्रांचे नियम स्थळ-काल निरपेक्ष नाहीत. ते संस्कृतिसापेक्ष, भाषासापेक्ष आहेत.

संस्कृतभाषेच्या व्याकरणाविषयी सांगायचे तर पाणिनीची अष्टाध्यायी आणि त्यावरील पातंजल महाभाष्य हे दोन महान ग्रंथ आहेत. त्यांतील मानवनिर्मित ज्ञान उच्च कोटीचे आहे. पाणिनीने व्याकरणशास्त्र पूर्णत्वाला नेले. त्यांतील सूत्रे म्हणजे अत्युच्च बुद्धीचा आविष्कार आहे. या अष्टाध्यायीवर महर्षी पतंजलीनी रचलेले पातंजल महाभाष्य हे तितकेच श्रेष्ठ आहे.

गणितशास्त्र एकदम परिणत झाले नाही. आवश्यकते अनुसार हळू हळू विकसित होत गेले. आज या शास्त्राचा फार मोठा विस्तार झाला आहे. अनेक प्रगत शास्त्रांना गणिताचे साहाय्य घ्यावे लागते. व्याकरणशास्त्र हे एका भाषेसाठी मर्यादित असते. गणितशास्त्राला भाषेच्या तसेच संस्कृतीच्या, स्थल-कालाच्या मर्यादा नाहीत. ते जागतिक आहे. सर्वांसाठी आहे. आजवर जगात अनेक महान गणिती होऊन गेले. भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांचे नाव सर्वश्रुत आहे.

माणसाने अनेक खेळ, क्रीडाप्रकार निर्माण केले. ते मुख्यत्वेकरून मनोरंजनार्थ असले तरी ते नियमबद्ध आहेत. म्हणून विविध क्रीडाप्रकार मानवनिर्मित ज्ञान आहे असे मी मानतो. सारीपाट, बुद्धिबळ, पत्ते, तसेच अनेकानेक मैदानी खेळ यांचा विचार केल्यास हे मानवनिर्मित ज्ञान आहे हे पटू शकेल. मला तरी हे ज्ञान वाटते. कारण प्रत्येक क्रीडा प्रकार नियमांनी बद्ध आहेत आणि ते नियम सर्वमान्य आहेत. निर्मित ज्ञानाचे आणखी अनेक विषय आहेत. कांही थोड्यांचाच इथे निर्देश केला आहे.

**भ्रमित ज्ञान**

भ्रमित ज्ञान म्हणजे विपरीत ज्ञान. म्हणजे अज्ञानच. माणसाला सत्यज्ञान शोधायचे असते. पण कधी कधी (खरे तर बरेचदा) मूळ संकल्पना अथवा गृहीत तत्त्व सदोष म्हणजे चुकीचे असते. कारण त्या त्या काळच्या ज्ञानाची ती मर्याद असते. तसेच सत्यान्वेषण करण्यास प्रवृत्त झालेल्या काही जणांचे काही पूर्वग्रह असतात. त्यामुळे ते भरकटतात. भलत्याच मार्गाने जाऊ लागतात. त्यातून विपरीत म्हणजे भ्रमित ज्ञान निर्माण होते.

उपनिषद् कालीन (हा काळ इ.स.पू. 1500 असावा.) ऋषि-मुनींचे उदाहरण घ्या. पुरुष, स्त्रिया, मुले हा 700/800 माणसांचा समूह असावा. त्याकाळी असे समूह ठिकठिकाणी असतील. पण त्यांचा फारसा परस्पर संबंध नसावा. कारण त्याकाळी संपर्कसाधने नव्हती. रस्ते, पूल काहीच नव्हते. पायी, अथवा फार तर बैलगाडीतून, घोड्यावरून प्रवास. एका समूहात प्रतिभावंत, बुद्धिमान, विचारवंत अशा ऋषींची संख्या अधिकतर 30/40 असेल. ते एकत्र जमून चर्चा करीत. त्यात त्यांचे काही शिष्यही असत. सजीव शरीरात आत्मा असतो. तो अमर असतो. अशा त्यांच्या पूर्वजांच्या कल्पना त्यांना मान्य होत्या. त्या गृहीतकावर त्यांनी पुढे विचार केला. माणूस मृत्यु पावतो. दहन केल्यावर शरीर नष्ट होते हे प्रत्यक्ष दिसत होते. अनुभवाला येत होते. मग अमर आत्म्याचे काय होते ? यावर विचारमंथन करून त्यांनी चार पर्याय शोधले. पुनर्जन्म, स्वर्ग, नरक आणि मोक्ष. ज्या माणसाच्या संचितात पुण्य कर्मांचे तसेच पाप कर्मांचे भोग शेष (शिल्लक) असतात त्याचा पुनर्जम होतो. ज्याच्या संचितात केवळ पुण्यकर्मांचे भोग राहिले आहेत, तो स्वर्गाला जातो. ज्याच्या संचितात केवळ पापाचे भोग आहेत, तो नरकात जातो. तर ज्याचे सर्व कर्मभोग भोगून संपले आहेत , संचितात काहीही राहिले नाही, त्याला मोक्ष मिळतो. हे त्यांना सयुक्तिक वाटले. जो माणूस मोक्षाचा अधिकारी आहे त्याचे निधन झाल्यावर त्याच्या आत्म्याची काय गती असते त्याचे उपनिषदांतील वर्णन पुढील प्रमाणे आहे:-

मोक्ष मिळविण्यास पात्र असलेल्या माणसाचा जेव्हा मृत्यू होतो तेव्हा त्याचा आत्मा सुषुम्ना नाडीतून वर वर येत, ब्रह्मरंध्र भेदून शरीराबाहेर पडतो. आत्म्यासमवेत प्राणही बाहेर येतात. तसेच पंच ज्ञानेंद्रिये (म्हणजे त्यांच्या अधिष्ठात्री

देवता) मृतशरीराबाहेर पडतात. आत्मा, प्राण आणि ज्ञानेंद्रिये सर्व सूक्ष्म रूपात असतात. ती सूक्ष्म शरीरात म्हणजे लिंगदेहात प्रवेश करतात. आता हा लिंग देह सूर्य किरणावर आरूढ होतो आणि त्यावर बसून वर वर सूर्यलोकी पोहोचतो. पृथ्वीपासून सूर्यापर्यंतच्या प्रवासाच्या या वाटेला अर्चिमार्ग म्हणतात. सूर्यलोकातून वर वर जात तो आत्मा चंद्रलोकात जातो. तिथून विद्युत्लोकात पोहोचतो. इथपर्यंतचा मार्ग लिंगदेहाला ठाऊक असतो. कारण सूर्य-चंद्र-विद्युत् पृथ्वीवरून दिसतात. तिथून पुढे ब्रह्मलोकाचा मार्ग आत्म्याला ठाऊक नसल्याने एक अमानवी पुरुष त्या आत्म्याला विद्युत् लोकातून ब्रह्मलोकी घेऊन जातो. तिथे त्या आत्म्याला मोक्ष प्राप्त होतो. आत्मा परब्रह्मात विलीन होतो. त्याचे जन्म-मृत्यूचे फेरे थांबतात. इहलोकापासून ब्रह्मलोकापर्यंतच्या प्रवासाचा आत्म्याचा हा जो मार्ग आहे त्याला देवयान मार्ग असे म्हणतात.

ज्याला आधुनिक  विज्ञानाची थोडीतरी ओळख आहे; तो हे देवयान मार्गाचे वर्णन वाचून म्हणेल, " काय हे लिहिले आहे ! याला काही अर्थ आहे का? आत्मा, प्राण, ज्ञानेंद्रिये सूक्ष्म रूपात लिंगदेहात बसतात काय. मग तो देह सूर्यकिरणावर बसून सूर्यलोकात जातो काय. तिथून चंद्रलोक, विद्युतलोक करीत शेवटी ब्रह्मलोकापर्यंत पोहोचतो काय? कशाला काही अर्थ? सूर्य आहे इथून 15 कोटी किमी अंतरावर. आधी तिथे जायचे. तिथून चंद्रावर म्हणजे 14 कोटी 96 लक्ष किमी मागे यायचे (कारण पृथ्वी पासून चंद्राचे अंतर आहे 4 लक्ष किमि.). आणि तो विद्युत्लोक कुठे आहे? वीज ढगात निर्माण होते.म्हणजे चंद्रावरून ढगात यायचे.  मग तिथून ब्रह्मलोकात जायचे? हा द्राविडी प्राणायाम कशाला? भूमीवरून ढगात गेले की विद्युत्लोक आला. पण उपनिषद्कालीन ऋषींच्या कल्पना वेगळ्या होत्या. सूर्यप्रकाश प्रखर असतो तर चंद्रप्रकाश सौम्य दिसतो. म्हणून सूर्यापेक्षा चंद्र खूप दूर असला पाहिजे. विद्युत् तर दिसते न दिसते तो अदृश्य होते. ती खूपच दूर आहे अशा त्या काळच्या कल्पना होत्या.  त्यावेळच्या ज्ञानाच्या त्या मर्यादा आहेत.

पण हे सारे उपनिषदांत आहे म्हणून सत्य असले पाहिजे असे मानणारे पुष्कळ लोक आहेत. ऋषी त्रिकालज्ञ होते. ते चुकीचे सांगणारच नाहीत. असे त्या धार्मिकांचे म्हणणे असते. पण आपण आज जाणतो की हे अज्ञान आहे.म्हणून याचा समावेश मानवनिर्मित भ्रमित ज्ञानात करायचा.  हे असे चुकीचे का निर्माण झाले? कारण अमर आत्मा असतो. ब्रह्मलोक अस्तित्वात आहे. मोक्षाची संकल्पना खरी आहे. अशी भ्रामक  गृहीतके खरी मानली. गृहीतक चुकीचे असले की अंतिम निष्कर्ष  चुकीचा निघणारच. त्यामुळे या भ्रमित ज्ञानाची निर्मिती झाली. देव आणि धर्म यांच्याशी निगडित बहुतेक संकल्पना भ्रामक आहेत. त्यामुळे देव-धर्म विषयांशी संबंधित बहुतेक तथाकथित ज्ञान, ब्रह्मज्ञान, अध्यात्मज्ञान हे भ्रमित ज्ञान आहे. म्हणजे अज्ञानच आहे. कारण देहाहून भिन्न असा आत्मा अस्तित्वात नाही.

भ्रमित ज्ञानाच्या निर्मितीचा मूळ हेतू सत्यान्वेषण हा असतो. पण चुकीच्या गृहीतकांमुळे तसेच अन्य काही कारणांमुळे मार्ग भटकतो आणि अज्ञान निर्माण होते. पुढे वैज्ञानिक शोधांमुळे हे सिद्ध झाल्यावर माणसाने भ्रमित ज्ञानाचा त्याग करायला हवा. पण तसे होत नाही. याचे  एक प्रमुख कारण म्हणजे हितसंबंध. या भ्रमित ज्ञानाने श्रद्धाळूंना फसवून त्यांचे आर्थिक शोषण करता येते हे समजल्यावर हितसंबंधी धूर्त आणि लबाड माणसे हे भ्रमित ज्ञान समाजात टिकवून धरण्याचे नाना प्रयत्न करतात. त्यांचे आर्थिक सामर्थ्य मोठे असल्याने ते यात यशस्वीही ठरतात. त्यामुळे अनेक धार्मिक कर्मकांडे , फलज्योतिषासारखी थोतांडे अजून टिकून आहेत. अनेक माणसे अज्ञानाच्या अवगुंठनात (पांघरुणात) आहेत. त्यांचे आर्थिक शोषण होत आहे. पण शोषितांना त्याची काहीच कल्पना नाही. समाजाची वैचारिक प्रगती खुंटली आहे.

या वैज्ञानिक युगातही भ्रमित ज्ञान दीर्घकाळ टिकून रहिल्याचे आणखी एक कारण म्हणजे आपले पूर्वज, ऋषि-मुनी, वेद-उपनिषदे-पुराणे-सर्वच धर्मग्रंथ यांविषयी अतिरिक्त दुरभिमान. त्यामुळे ही भ्रमित ज्ञानप्रेमी श्रद्धावंत  माणसे " आमच्या वेद-उपनिषदांत सर्व ज्ञान आहेच. आम्हांला आधुनिक विज्ञानाची आवश्यकता नाही. वेदांचा अभ्यास करून त्यांचा अर्थ लावला, यज्ञ-यागादि श्रुति-स्मृति-पुराणोक्त कर्मकांडे यथासांग केली म्हणजे झाले. आम्हांला सगळे येणारच. आम्ही जगाचे नेतृत्व करणारच. ते विधिलिखितच आहे. पूर्वी आपण विश्वगुरू होतो. ते पद आम्हांला पुन:

प्राप्त होईल." अशा भलभलत्या अवास्तव कल्पनांत गुंग होऊन राहातात.

ज्ञाननिर्मितीचा हेतू सत्यान्वेषण (सत्य शोधणे) हा असतो.पण चुकीच्या गृहीतकांमुळे तसेच अन्य काही कारणांनी अन्वेषणाचा मार्ग भरकटतो. आणि भ्रमित ज्ञान निर्माण होते, हे आपण पाहिले.

**भंपक विज्ञान (स्यूडो सायन्स)**

हे मानव निर्मित आहे. कारण हे ज्ञान विश्वात आधीच असित्वात असलेल्या निसर्गनियमांचे ज्ञान नव्हे. हे भंपक विज्ञान म्हणजे अज्ञानच आहे. भ्रमितज्ञान आणि भंपकविज्ञान ही दोन्ही मानवनिर्मित असली आणि दोघांचाही समावेश अंतत: अज्ञानात होत असला तरी आपल्या देशात त्यांच्या निर्मितीप्रक्रिया मूलत: भिन्न आहेत. म्हणून हे दोन वेगळे प्रकार मानले आहेत. भ्रमितज्ञान निर्मितीचा मूळ हेतू सत्यान्वेषण हा असतो हे वर सांगितलेच आहे. आपल्याकडे भंपकविज्ञानाचा मूळ हेतू श्रद्धाळूंना फसवून आर्थिक लाभ उठवणे हा असतो. भ्रमितज्ञान प्राचीन काळापासून आहे. तर आपल्याकडचे भंपक विज्ञान हे अलिकडचे, विज्ञानाच्या विकासानंतरचे, म्हणजे गेल्या तीन/चारशे वर्षांतले आहे.

साधारणत: पंधराव्या शतकात आधुनिक विज्ञानाचा प्रारंभ झाला. सत्यान्वेषणाची वैज्ञानिक पद्धत समजली. विज्ञान वेगाने विकसित होऊ लागले. त्यावर आधारित तंत्रज्ञानामुळे माणसाला जीवनोपयोगी अशा अनेक सुखसुविधा निर्माण झाल्या. वैज्ञानिक तत्त्वांची सत्यता आणि विश्वासार्हता यांचा प्रत्यय प्रत्यही येऊ लागला. विज्ञानाची लोकप्रियता वाढली. तेव्हा भंपक विज्ञान पसरू लागले. भौतिक शास्त्रातील विद्युत्चुंबकीय लहरी, ऊर्जा लहरी, एलेक्ट्रो- मॅग्नेटिक फिल्ड, तरंग, स्पंदने, पुंज सिद्धान्त, (क्वांटम थिअरी), प्रिन्सिपल् ऑफ़ अन्सर्टन्टी, असल्या संज्ञा वापरून भंपक विज्ञान हे खरे विज्ञानच आहे असा आभास निर्माण करून श्रद्धाळूंची फसवणूक सुरू झाली. शासन यंत्रणा तसेच वैज्ञानिक यांनी प्रसार माध्यमांद्वारे वैज्ञानिक तत्त्वांची ओळख जनसामान्यांना सोप्या शब्दांत करून द्यायला हवी होती. त्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण करायला हवी होती. ते झाले नाही. त्यामुळे सामान्य जनांत वैज्ञानिक दृष्टिकोन रुजला नाही. त्याचा भंपक विज्ञानवाद्यांनी अपलाभ घेतला. काही करून पैसे मिळविणे हाच त्यांचा हेतू असतो. त्या स्वार्थी माणसांना लोकांच्या भल्याची, समाजाच्या हिताची, देशाच्या प्रगतीची पर्वा नसते.

फलज्योतिष हे जरी प्रारंभी भ्रमितज्ञान म्हणून निर्माण झाले असले तरी प्रबळ हितसंबंधांमुळे आता त्याला भंपक विज्ञानाचे रूप आले आहे. फलज्योतिषाची मूळ गृहीतके चुकीची म्हणजे खोटी आहेतच. पण श्रद्धाळूंना सतत अज्ञानात ठेवून त्यांचे आर्थिक शोषण करणे हे आतां प्रमुख उद्दिष्ट झाले आहे. सर्व भंपक शास्त्रांचा देव-धर्म, ऋषि-मुनी, परंपरा-रूढी, यांच्याशी ओढून-ताणून संबंध जोडला आहे. कारण बहुसंख्य माणसांच्या देवा-धर्मावरील श्रद्धा दृढ आहेत. या श्रद्धाळू मनोवृत्तीचा अपलाभ(गैर फायदा) भंपक विज्ञानवाले घेतात.

वास्तु(दिशाभूल)शास्त्र हे मानवनिर्मित भंपक विज्ञानच आहे. या विषयावरील पुस्तके अथपासून इतिपर्यंत हास्यास्पद विधानांनी भरलेली असतात. " आपली जन्म तारीख 1,10, 19, किंवा 28असेल तर आपल्या घराला पिवळा रंग लावावा. त्यामुळे व्यवसायाची भरभराट होईल." "हिरव्या रंगाचे फुलपाखराचे चित्र घरातील उत्तर दिशेच्या भिंतीवर लावावे. त्यामुळे घरात शांती नांदेल." असली वास्तुतत्त्वे(!) माणसाला खरी कशी वाटू शकतात ? माणसाची बुद्धी इतक्या रसातळाला कशी जाऊ शकते याचे आश्चर्य वाटते. प्राणिक हीलिंग तथा प्राणशक्ति उपचार हे भंपक विज्ञानच आहे. ते वास्तु (दिशाभूल) शास्त्रा इतकेच हास्यास्पद आहे. अशी अनेक भंपक शास्त्रे (स्यूडो सायन्सेस) आहेत. श्रद्धावंत माणसे या शास्त्रांना वेळोवेळी बळी पडत असतात.आणि त्यांचे आर्थिक शोषण होत असते. पण दुर्दैवाने ते त्यांच्या लक्षातच येत नाही.

ynwala@gmail.com

• • •

# विवेकवाद विकसित करण्यासाठी...

*दत्ता देसाई*

विवेकवाद.....मानसिकता.....समाज

डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्या होण्याचं मुख्य कारण म्हणजे त्यांनी भारतीय विवेकवादाचं मुख्य स्वरूप सातत्यानं लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी संकुचित भूमिका घेतली म्हणून दुसऱ्या संकुचितांनी त्यांच्यावर हल्ला केला असं अजिबात नाही. त्यांनी व्यापक भूमिका घेतली. ती सहन न झाल्यामुळे जी संकुचित विचारांची मंडळी आहेत, त्यांनी त्यांना मारण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे भारतीय विवेकवादाचं व्यापक स्वरूप लक्षात घेताना याची उभी विभागणी करण्याची जी पद्धत आहे, ती मुळातून तपासली पाहिजे. उभ्या विभागणीत विवेकवादी एकीकडे आणि अविवेवकवादी दुसरीकडे किंवा अमूक एक परंपरा एकीकडे आणि दुसरी परंपरा दुसरीकडे अशी विभागणी केली जाते. त्यातून प्रतिगामी किंवा संकुचित विचार बळकट होण्याला बळ मिळत जातं. भिंत उभारण्याचा कार्यक्रम हा अर्थातच संकुचित मंडळींचा असतो. त्यामुळे आपण भारतीय विवेकवादाचं मुळातलं व्यापक स्वरूप काय आहे, विवेक आणि अविवेक यांच्यात सतत चाललेला संघर्ष व देवघेव याचं स्वरूप काय आहे हे बघायला पाहिजे.

दोन-तीन उदाहरणं पाहू. पहिलं म्हणजे भारतीय विवेकवादाला केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक आयामसुद्धा आहे. अजित केशकंबल किंवा गौतम बुद्ध आपलं तत्त्वज्ञान मांडत होते, त्याच्याआधीपासून ग्रीक आणि भारतीय समाज, चिनी आणि भारतीय समाज, यांच्यात सातत्याने देवघेव होती. ती जशी वस्तूंच्या पातळीवरची होती, तशीच मिथ्यकथा, पुराणकथा, तत्त्वज्ञानं आणि सांस्कृतिक बाबी अशा सर्व प्रकारची देवघेव होती. ग्रीकांकडून भारतीयांनी फलज्योतिष्य आणि मूर्तीकला घेतली. दुसऱ्या बाजूला भारतीय तत्त्वज्ञानातून काही ग्रीकांकडे जाणं आणि ग्रीकांकडून अणुवादासारखं तत्त्वज्ञान भारतात येणं अशा काही गोष्टी घडलेल्या दिसतात. विज्ञानातही पायाभूत तत्त्वंविज्ञान आणि विवेकवाद, विज्ञान आणि संस्कृती, विवेक आणि भावना, या सगळ्यांना एकत्र आणणं आणि त्यांची फारकत करणं, या दोन्ही गोष्टी आधुनिक काळात मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या.

विज्ञान हे मूल्यनिरपेक्ष, त्याला विवेक असेलच असं नाही. ते भावना निरपेक्ष. विवेक हा मूल्यांचा, तत्त्वांचा विचार करणारा भाग मानणं आणि मानवी भावना कला-संस्कृतीचा भाग मानणं. मग म्हणायचं की, भावनेपेक्षा विवेकाला महत्त्व दिलं पाहिजे. विज्ञानाला आपण विवेकाची जोड देऊ या. ही एक मोठी समस्या आहे. याचं कारण आधुनिक काळात युरोपात विज्ञान आलं, त्याच्याशी जोडून विवेकवाद आला, त्याची पहिली लढाई ख्रिश्चन धर्माबरोबर, चर्चबरोबर होती. मुळात विज्ञानाचा पहिला उगम चर्चच्या पोटातून झालेला आहे. त्यामुळे त्यांना नंतर असं सांगावं लागलं की, विज्ञान हे स्वायत्त आहे. ते धर्मनिरपेक्ष आहे असं म्हणणं शक्य नव्हतं. हीच संकल्पना नंतर भांडवली विकासाला पोषक ठरली. भांडवलशाहीला न-नैतिक गोष्टीच हव्या असतात. खरं म्हणजे विज्ञानात असं असू शकत नाही. गेल्या दोनशे-अडीचशे वर्षांत आणि विशेषत: विसाव्या शतकातल्या आधुनिक विज्ञानाचा प्रवास बघितला, तर निसर्गविज्ञानातसुद्धा पायाभूत तत्त्व म्हणून तत्त्वज्ञानात्मक आणि मूल्यांच्या गोष्टी दडलेल्या दिसतात. त्या उकरून बाहेर काढाव्या लागतात. हे लक्षात घेतलं तर विज्ञानाची संकल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोनाची संकल्पना आणि विवेकाची संकल्पना आजच्या युगात रि-डिफाइन करायची गरज निर्माण होते. या तिन्हींच्या पोटात मानवी भावभावना, मूल्य, या समग्र दृष्टिकोनावर आपण भर देण्याची गरज आहे. त्यावर जगभर प्रयत्न सुरू आहेत. भारतीय परंपरेतसुद्धा ही समग्रपणे विचार करण्याची धडपड आपल्याला दिसत आलेली आहे. अर्थात त्यातही विवेकानं, विज्ञानिक दृष्टिकोनातून पाहावं लागतं. कारण त्यात गूढवाद, जातिव्यवस्था, पुरुषप्रधानता या गोष्टी मिसळलेल्या असतात. त्यामुळे समग्रता पकडत असताना विज्ञानाचा विवेकावर आणि विवेकाचा विज्ञानावर आणि संस्कृतीचा विज्ञान-विवेकावर आणि त्यांचा

संस्कृतींवर असा सतत दबाव संघर्ष आणि देवघेव होत असते. त्यातून सर्जनशील गोष्ट पुढे येऊ शकते, हे लक्षात घेण्याची गरज आज आहे. नाहीतर आपण कप्प्यांत अडकतो आणि नकारात्मक भूमिका घेतो.

चिंतनाचा आणि कामाचा भागसंस्कृती नावाची जी गोष्ट असते, त्यातल्या बारकाव्यात जाण्याची आता गरज निर्माण झालेली आहे. ती वास्तवात आपण करतो आहोत, पण वैचारिक पातळीवरही नीट करायला पाहिजे. भारतीय उत्सवांमध्ये वेगवेगळे पैलू आहेत. एक आहे- माणसांची उत्सवप्रियता, दुसरा- कृषी आणि उत्पादन चक्राशी संबंधित भौतिक भाग, तिसरा- कर्मकांडं व श्रद्धा, चौथा- लोकांना लागणारी सर्जनशील आणि आनंदाची आऊटलेट्स. या गोष्टींमुळे उत्सवांबाबत सरधोपट भूमिका न घेता, त्या उत्सवातला जेवढा गूढवादी, संकुचित, अविवेकी भाग कसा बाजूला होईल किंवा विवेकी पर्याय कसे उभे होतील यातलं काहीतरी आपल्याला करावं लागेल. त्यामुळे तो सगळा भाग हा आपल्या आस्थेचा, चिंतनाचा आणि कामाचा भाग असला पाहिजे. उदा. अंनिसने होळी आणि पोळीच्या संदर्भात किंवा गणपती विसर्जनाबाबत घेतलेली भूमिका. भारत ज्ञान-विज्ञानने 2001मध्ये फटाके नको, पुस्तके हवी अशी भूमिका घेतली होती. उत्सवातला चुकीचा, अनावश्यक, प्रदूषणकारी, अविवेकी भाग बाजूला कसा होईल आणि उरलेला भाग लोक एन्जॉय कसा करू शकतील हे पाहावं लागेल.

थोडक्यात तर-तम करणं, बारकाईने पाहणं आणि खोलात जाणं. विवेक-अविवेकाची जी ढोबळ घोषणावजा विभागणी केली जाते, त्याच्यापलीकडे जाण्याची गरज आहे. धर्माकडे पाहण्याची नवी दृष्टी हवीमहात्मा फुले, न्या. रानडे, महात्मा गांधी, वि.रा.शिंदे, बाबासाहेब आंबेडकर, पं. नेहरू, भगतसिंग या सगळ्या मंडळींनी धर्माबाबत जी भूमिका घेतली आहे, तीसुद्धा बारकाईने पाहण्याची गरज आहे. भारतात धर्मांध, अविवेकी धर्मवादी आणि धर्मनिरपेक्ष अशी नुसती उभी फूट करणं हे पुरेसं विवेकी, वैज्ञानिक नाही. सामाजिक-सांस्कृतिक जीवनात व्यापक स्तरावर बघत असताना या दोन्ही विभागण्यांच्या पलीकडे जाण्याची गरज आहे.

धर्माबाबत चार-पाच भाग करता येतील.पहिल्या प्रवाहातली माणसं धार्मिक वा धर्मश्रद्ध आहेत किंवा गांधीजी म्हणतात त्या अर्थाने सनातनी आहेत. (अर्थात सनातन प्रभात छाप नव्हे). ही जुनी, प्राचीन, सनातनी मूल्य मानतात. ही धार्मिक पुनरुज्जीवनवादी आहेत. दुसऱ्या प्रवाहात धर्मसुधारक, नवधर्मप्रणेते आहेत. मग तो महात्मा फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म असेल वा बाबासाहेबांचा नवबौद्ध धर्म असेल. आज ते भारतात मोठ्या प्रमाणावर नाही, पण उद्या ते भारतात येणारच नाही असं म्हणता येत नाही, ते म्हणजे लिबरेशन थिऑलॉजी. ती लॅटिन-अमेरिकेत आहे. पोप फ्रान्सिस त्या भाषेत थोडे थोडे बोलतात. म्हणजे धर्म आधाराला घेऊन मुक्ती करणं किंवा संघर्ष करणं किंवा समाज बदलणं.तिसऱ्या प्रवाहात, धर्मनिरपेक्ष, निधर्मी, नास्तिक किंवा धर्मातीत मानवतावादी आहेत... जे केवळ नास्तिक होऊन थांबत नाहीत. ते म्हणतात, धर्माने दिलेली जी मूल्ये आहेत त्याला उच्चस्तरावर नेणारे आम्ही मानवतावादी आहोत. चौथा प्रवाह आहे, धर्मांध, धार्मिक दहशतवादी, धर्मवेडे, धार्मिक अतिरेकी यांचा. या प्रवाहातले जे नेतृत्व आणि गड्डे आहेत, त्यांच्याबद्दल अत्यंत परखड स्पष्ट भूमिका घेणं अत्यावश्यक आहे. पण या प्रवाहातली अनेक मंडळी अशी आहेत की, त्यांच्यातला विवेक जागा करण्याची गरज आहे. त्यांच्याशी नातं कसं जोडणार हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. उदा. परवा मुंबईत इसिसकडे जाणाऱ्या चार मुलांना पोलिसांनी पकडलं.

कुठल्याही धर्मातल्या अतिरेकी संघटनांकडे वळणाऱ्या माणसांशी संवाद करणं आणि विवेकातून त्यांना बदलायचा प्रयत्न करणं ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. ती केवळ हिंसेला हिंसा वा शस्त्रबळाच्या जोरावर होणारी गोष्ट नाही. एवीतेवी पोलिस गुन्हेगारांना फारसं पकडू शकत नाहीत. पानसरे-दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना तर ते पकडूच शकलेले नाहीत. तेव्हा पोलिसांनी अशा वाट चुकलेल्यांशी विवेकी संवाद करून त्यांना धर्मांध मार्गापासून परावृत्त करावं. मला असं वाटतं की, एका प्रगत समाजात पोलिसांचं काम केवळ लॉ अँड ऑर्डर चं नसून समुपदेशन आणि संवादाचंही असतं. अर्थात हा सामाजिक संघटनांच्या समोरचाही प्रश्न आहे.

सुरुवातीचे जे तिन्ही प्रवाह आहेत, त्यात प्रचंड जागा आहे. कोट्यवधी लोक त्या प्रवाहांच्या कुठल्या ना कुठल्या छटेमध्ये वावरत आहेत. त्यांच्याशी सतत नातं जोडणं आणि त्यांना तर-तम करायला शिकवणं, धर्माच्या पोटातसुद्धा विवेकाकडे जाणाऱ्या जागा कोणत्या आहेत, हे काम करणाऱ्या ज्या सगळ्या चळवळी, संस्था, संघटना असू शकतात ते आपले दोस्त कसे बनतील, ते अधिकाधिक धर्मनिरपेक्षतेकडे आणि विवेकवादाकडे कशी वाटचाल करतील हा आपला सततचा कार्यक्रम असला पाहिजे. आज वाईट परिस्थिती असताना स्वप्नं पाहावीत की नाहीत असा अनेकांना प्रश्न पडतो. प्रत्येकाजवळचं छोटं स्वप्न आणि कष्टकरी वर्गाचं, आम जनतेचं, देशाचं असं मोठं स्वप्न तयार होणं आणि ते वैज्ञानिक, विवेकी दृष्टिकोनाच्या आधारे प्रत्यक्षात आणण्याची धडपड करणं असा एक प्रदीर्घ कालखंड येऊ घातलेला आहे. त्यामध्ये विवेक विकसित होऊ शकेल, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होईल. आपली संस्कृतीही विकसित होईल... आणि आपली स्वप्नं प्रत्यक्षात येतील.

dattakdesai@gmail.com

●●●

# महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या निमित्ताने...

*राहुल वैद्य*

**राजकारण....जात-धर्म....समाज**

महाराष्ट्रातील सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात 'बाबासाहेब पुरंदरे' यांचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार आणि त्यानिमित्ताने नुकताच झालेला प्रचंड वाद हा महत्वाचा आहे.

पुरोगामी चळवळ सांस्कृतिक राजकारण कसे करते, आपले डावपेच कसे मांडते- प्रतिपक्षाचे डावपेच कसे जोखते, वादंगाच्या आपल्या व्याख्या कितपत जोरकसपणे लोकांपुढे मांडते या सगळ्या परीप्रेक्ष्यामध्ये काही मुद्दे लक्षात घेतले पाहिजेत - तसे ते घेतले नाहीत तर आपल्या विरोधाची दिशाच चुकते चुकत आली आहे असे मला वाटते. त्यासाठी हे छोटे टिपण.

**जातीचा प्रश्न**

एकूण या वादामध्ये ब्राह्मणी छावणी (ब्राह्मण नाही) हुशारीने 'मूळ प्रश्न 'जातीचा आहे', 'पुरंदरेंच्या जातीमुळे त्यांना विरोध' असे 'तांडव' करून आपण किती 'सोवळे', 'जात पात विसरून पुढारलेले' अशी मुद्याला बगल देत आहे. हिंदुत्व हा मुळात त्याचाच व्यापक परिपाक आहे- ब्राह्मणी छावणीच्या जात-विस्मरणातील आटोकाट प्रयत्नांचा. त्याला विरोध म्हणून 'मराठा-विरुद्ध ब्राह्मण' असा वाद लागणे हे ब्राह्मणी छावणीसाठी सोयीचे आहे. त्यांच्या मानभावी कारस्थानाला पोषक आहे. पुरोगामी संघटनांनी हा कावा ओळखला पाहिजे.

आता पुरोगामी संघटना हा कावा खरे तर ओळखून आहेतच. त्याला प्रतिक्रिया म्हणूनच तर स्थूलपणे communist आणि समाजवादी संघटना 'पुरंदरे यांच्या प्रतिगामी इतिहास-दृष्टीलाही विरोध आणि संभाजी ब्रिगेड च्या मराठा केंद्रित राजकारणाला सुद्धा विरोध' अशी 'दोन्ही पक्षांपासून एक समान अंतर ठेवणारी' भूमिका घेतात- मुक्ता दाभोलकर यांच्या 'लोकसत्ता' मधील पत्राने हा मुद्दा अधिक स्पष्ट झाला आहेच. खरे तर पुरंदरे यांच्या जेम्स लेन प्रकरणी सुद्धा अशीच भूमिका पुरोगामी संघटनानी घेतली होती. पण कळीचा प्रश्न असा आहे, की या भूमिकेचा राजकीय अर्थ काय निघतो? या भूमिकेतून वादाला काही नवे वळण मिळाले आहे काय? की त्यामुळे केवळ राजकीय नैतिकता जपली जाते? पुन्हा त्या नैतिकतेचा राजकीय फायदा होईल अशी काही संघटनात्मक बांधणी करून लोकांना आपली भूमिका पटवून देणे असाही पवित्रा दिसत नाही.

दुसऱ्या बाजूला विशेष नजरेत भरते तो दलित संघटना, साहित्यिक यांचे मौन. आता त्या मौनाचा अर्थ 'हा झगडा ब्राह्मण आणि मराठा यांचा सत्ता वर्चस्वाचा आहे. या नागनाथ आणि सर्पनाथ यांच्या लढाई मध्ये आम्ही दलितांनी काय म्हणून पडावे' असा काहीसा निघतो. म्हणजे दलित, पुरोगामी यांच्या भूमिका समांतर जात आहेत. 'ह्या दोन बोक्यांच्या लढाई मध्ये आम्ही पडणार नाही. आमची लढाई वेगळी आहे, दुष्काळ, अत्याचार, आरक्षण अशा सामाजिक, आर्थिक म्हणजे ताबडतोबीच्या गोष्टींवर आम्ही लढतो आहोत. आम्ही FTII, आंबेडकर पेरियार स्टडी सर्कल अश्या शिक्षणाच्या भगवीकरनाबद्दल जरूर संघर्ष करू. पण उगीच लोकप्रिय इतिहास आणि त्याचे आकलन, त्याचे सांस्कृतिक राजकारण ह्यामध्ये आम्हाला गोवू नका'. असा काहीसा एकूण सूर दिसतो.

प्रश्न संभाजी ब्रिगेड किंवा शरद पवार यांचे आंधळेपणाने समर्थन करायचे का असा नाही. प्रश्न आपल्या राजकीय भूमिकेचा आणि तौलनिकपणाने अधिक घातक शत्रू कोण हे ठरवून त्याप्रमाणे लढण्याचा आहे. आणि एका पातळीवर, आपला इतिहास सांप्रदायिक तऱ्हेने लिहिण्याला आपला विरोध केवळ समान अंतर ठेवून किंवा सोयीस्कर मौन पाळून स्पष्ट होत नाही. केवळ समान अंतर ठेवून 'शुचिता' जपता येईल, त्याने राजकारण सिद्ध होणार नाही. होत नाही. त्याने केवळ आपला गोंधळ किंवा आपली क्षीण राजकीय ताकद दिसते.

दुसरा मुद्दा पुरंदरे यांच्या 'इतिहासाचा'. एका बाजूला त्यांनी आपल्या शाहिरीने महाराष्ट्रातील लोकांना 'शिवाजी महाराजांची ओळख करून दिली' असे जे लबाडीने खपवले जाते ते बाजूला ठेवू. फुले, आणि टिळक यांनी ते काम आधीच करून ठेवले होते. पण, पुरंदरे यांनी 'नव्याने' ओळख दिली हा भाग खरा आहे आणि fascist इतिहास पुनर्लेखन किती यशस्वी झाले आहे त्याचा पुरावा आहे. आता पुरंदरे यांन्च्याबद्दल 'प्रतिगामी' आणि 'ब्राह्मणी' अशी विशेषणे वापरताना एक सावधगिरी बाळगली पाहिजे. 'सामना' चे संपादकीय, पुरंदरे यांचे लेखन, आणि दर रोजच्या व्यवहारात लोकांचे सांप्रदायिकपण यासाठी एकच एक 'प्रतिगामी' असे विशेषण वापरताना त्या प्रत्येक प्रतिगामी व्यवहारात असलेले निराळे संदर्भ, त्यांचे व्यवहारातील वेगळेपण हे लक्षात ठेवले पाहिजे.

पुरंदरे यांचा इतिहास, हिंदुत्वाच्या प्रिय अश्या 'द्विराष्ट्र' सिद्धांतावर उभा आहे. यादव, विजयनगर यांच्या पाडावानंतर 350 वर्षांची काळरात्र होते ती ह्याच 'हिंदू राष्ट्र' च्या कल्पनेला धरून. 'सकळ पृथ्वी आंदोळली 'धर्म गेला' असे मंदिरांच्या लुटीचे वर्णन होते. 'गरीब बिचारे हिंदू (गायीप्रमाणे) परकीय मुस्लीम कसाई राज्यकर्त्यांचे जुलूम सहन करत राहतात, कुणी एखादा अवतारी पुरुष शिवाजीप्रमाणे आला तर हेच हिंदू दगाबाजी करतात, राष्ट्र महान आहे, पण इथले लोक अज्ञ आहेत' असे 1980 नंतर जोमाने पुढे आलेले राजकीय हिंदुत्व, पुरंदरे यांच्या इतिहासाच्या मशागतीवर उभारलेले आहे. खरे तर त्याला मूळ आधार आहे तो इतिहासाच्या 'प्राचीन च्या ऐवजी हिंदू, मध्ययुगीन च्या ऐवजी मुस्लीम आणि आधुनिक च्या ऐवजी ब्रिटीश' अश्या विभागणीचा. अगदी रियासतकार सरदेसाई देखील ह्या ब्रिटीश राजवटीतल्या इतिहासाच्या काळ विभागणीचा आसरा घेतात. 'हिंदू हे मूळ रहिवासी आणि मुस्लीम हे मूळ आक्रमक' अशी ही विभागणी RSS च्या प्रिय सिद्धांताला पोषक आहे. साम्राज्यवादविरोधी लढ्यात फूट पाडणारी आहे. खरी चिंतेची बाब अशी आहे की 'मूळ निवासी' हा सिद्धांत लोकप्रिय झाला आहे, लढ्याचा पाया बनला आहे. ब्राह्मणी असो की अब्राह्मणी, दोन्ही छावण्या 'मूळ निवासी' ह्या मांडणी ला धक्का देत नाहीत. आणि तसे झाले की अगदी 'पुरोगामी' म्हणवणाऱ्या आंदोलनाना देखील कसे प्रतिगामी वळण मिळते हे आपल्या चांगलेच परिचयाचे आहे. त्या अर्थाने दलित- पुरोगामी संघटना ह्या वादापासून का फटकून राहिल्या आहेत हे समजण्याजोगे आहे. पण तितकेच धोकादायक देखील आहे.

**अनैतिहासिक इतिहास आणि राजकारण**

अखेर 'उदारमतवादी आणि मानभावी लोकांच्या समजुतीप्रमाणे जुन्या इतिहासकारांनी पुरंदरे यांच्या इतिहासाबद्दल काय म्हटले आहे ते सांगून' वाद मिटणार नाही, मिटत नसतो. कारण तेव्हा सोयीने पुरंदरे यांची होते 'शाहिरी', 'ललित कला'. मग 'शहाजी- जिजाबाई विरुध्द रामदास-दादोजी' असले वर्गीकरण हे आपल्या वर्तमान संघर्षाचे एक

rhetorical ऐतिहासिक रूप बनते आणि त्यात कल्पनाविस्तार होतात, 'आपले विरुध्द त्यांचे' अशा तऱ्हेने. आता हे कल्पनाविस्तार एका पातळीवर 'हिंदू विरुध्द मुस्लीम' असला काल्पनिक संघर्ष देखील त्या काळात होता (शिवाजी-चंद्रराव मोरे, जय सिंग किंवा शिवाजी कुतुब शहा संबंध विसरून), ह्या logic च्या तऱ्हेचे राहतात. इतिहास लेखन म्हणजे आजच्या राजकीय संघर्षाचे विस्तारित रूप असते. 'identity' ला मूळ ठेवणाऱ्या राजकारणात असले अनैतिहासिक प्रकार होतच राहणार. जातीचा प्रश्न, इतिहास की शाहिरी असले वाद निव्वळ मानापमानाच्या लढाईत सुटणारे नाहीत. उलट ते जास्त गडद होतात.

**'कुळवाडी भूषण' शिवाजी आणि राष्ट्रक**

तेव्हा ह्या अनैतिहासिक इतिहासाच्या राजकारणात महात्मा फुले- कॉम्रेड पानसरे यांच्या 'कुळवाडी भूषण' शिवाजीला मध्यभागी आणायची आवश्यकता आहे. १७व्या शतकात 'राष्ट्र' किंवा 'धर्म' आजच्या आधुनिक अर्थाने किंवा तऱ्हेने वापरात नव्हते. त्या काळातील उत्पादन संबंध, त्यातील शिवाजीचे योगदान आणि महत्व, जमीनदाराना बसवलेला चाप हे खरे त्या राष्ट्रवादाचे मूळ आहे. नाहीतर, राजपूत राजे कमी 'हिंदू' नव्हते. पण महाराष्ट्र हे राष्ट्र बनले, जुलमी पेशवाई मधेही टिकून राहिले, ते शिवाजीच्या ह्या क्रांतिकारक धोरणामुळे. त्यामुळे त्याला एकदम महाराष्ट्रातील लेनिन करायची गरज नाही. (राजवाडे यांनी रामदासाला महाराष्ट्राचा हेगेल म्हटले होते तसे). पण 'जातिच्या आधारित विरोध आहे' असे जे म्हणतात त्यांचा प्रतिवाद केवळ जातीसंबंध आणि त्यातील जुलूम, अपमान उलगडून होत नसतो- त्यातील वर्गसंबंध देखील लक्षात ठेवावे लागतात. फुले यांचे मोठेपण त्यासाठीच कि त्यांनी 'कुळवाडी भूषण' हे 'व्यापक जाती-सूचक आणि वर्ग-वाचक' अभिदान वापरले. आणखी महत्वाचे म्हणजे आजही आपली राष्ट्रक म्हणून जी ओळख आहे ती 'शिवाजी'शी निगडीत आहे. केवळ प्रतिगामी शक्तींना दोष देऊन, ती ओळख बदलणार नाही. आपले आजचे उत्पादन संबंध, जाती संघर्ष हे विशिष्ट तऱ्हेने व्यक्त होतात आणि त्यासाठी आजही 'राष्ट्रक' ही ओळख महत्वाची आहे. कॉम्रेड डांगे, कॉम्रेड पानसरे अश्या communist नेत्यांनी 'शिवाजी' ही राष्ट्रक म्हणून महाराष्ट्राची ओळख लक्षात ठेवून 'शिवाजी आमचा आणि त्यांचा' अशी रोखठोक 'लोकांचा राजा शिवाजी' म्हणून आपली भूमिका मांडली. 'फुले शाहू आंबेडकर' यांचा महाराष्ट्र आहेच, पण शिवाजी आणि महाराष्ट्र ही ओळख देखील मूलभूत आहे, तिला पुरेसे महत्व देण्याची गरज आहे. पुरोगामी विचार आणि राष्ट्रवाद याबद्दलचा यशस्वी fascist प्रचार कुठेतरी आपल्या राष्ट्रवादाच्या व्याखेतील त्रुटीचा आणि तिला प्रतिगामी राष्ट्रवादापासून वेगळ्या अशा पायावर उभी न करण्याचा परिपाक आहे. मग एकीकडे 'सर्वच राष्ट्रवाद घातक' अशी समजूत होते, किंवा 'आर्थिक बाबतीत पुरोगामी डावी भूमिका आणि सांस्कृतिक क्षेत्र उजव्या शक्तींना मोकळे' अशी परिस्थिती होते.

माझ्या माहितीप्रमाणे विद्याधर दाते यांनी आपल्या countercurrents.org मधील लेखात शिवाजीला 'पुरोगामी, secular, किंवा जमीन महसुलात क्रांतिकारी सुधारणा करणारा लोकप्रिय राजा' असे ठरवण्याची गरज नाही असे प्रतिपादन केले आहे. प्रश्न असा आहे- की शिवाजीला कोणीही डाव्या पक्षांनी क्रांतिकारक ठरवलेले नाही. पण मग 'शिवाजी आणि महाराष्ट्र' असा संबंध कसा वाचायचा? राजकारणाला सतत आर्थिक पाया आणि इमला असे पाहणे किती धोकादायक असते ते नव्याने सांगायला नको. पण शिवाजीच्या लोकप्रियतेचा आणि महाराष्ट्र या राष्ट्रकाच्या उदयाचा आर्थिक संबंध कसा पहायचा ते देखील महत्वाचे आहे. मध्ययुगीन राजावर आधुनिक कल्पनांचे आरोपण नको हे ठीक आहे. पण त्या काळाच्या संदर्भात आणि जमीनदारांशी असलेल्या शिवाजीच्या राजकीय संबंधांच्या पार्श्वभूमीवर हा इतिहास मांडला पाहिजे. तरच त्याचा अर्थ लागायला मदत होते.

अखेरीस, लोकप्रिय संस्कृतीमध्ये पुरोगामी विचारांची पीछेहाट काही आजची नाही. त्यात कॉम्रेड पानसरे यांचे बलिदान हे सर्वात ठळक. एकीकडे रेशीमबागेच्या तालावर चालणारे फडणविशी सरकार कॉम्रेड पानसरे यांच्या हत्येकडे डोळेझाक करते, आणि दुसरीकडे बाबासाहेब पुरंदरे सारख्याना 'महाराष्ट्र भूषण' म्हणून गौरवते हा विरोधाभास नाही. त्यात एक उघड राजकीय सातत्य आहे. कॉम्रेड पानसरे यांच्या लढाईचा खरा अर्थ ह्या ब्राह्मणी

छावणीला, इतिहासाच्या विकृतीकारणाला एक सातत्यपूर्ण राजकीय विरोध आहे. ही लढाई शिवाजी चे केवळ banner, sticker किंवा 'मराठ्याचा अपमान' असे नारे देऊन जिंकता येणार नाही. ब्राह्मणी छावणीकडे त्याला पुरून उरेल इतका पैसा, वेळ, कावा, चातुरी आणि पुरंदरे आहेत. त्याला शह कसा द्यायचा हा खरा प्रश्न आहे. आणि त्यासाठी पुरोगामी- दलित चळवळीचा हस्तक्षेप महत्वाचा आहे. म्हणूनच 'केवळ 'समान अंतर' ठेवू नका, किंवा मौन पाळू नका, गो. पु. देशपांडे म्हणत तसे 'धिटाईने वादंगात सहभागी व्हा!'

rahul.democrat@gmail.com,

●●●

# समानतेचे अवघड गणित

*कुमार केतकर*

राजकारण....समाज.....चिकित्सा

समता, समानता आणि समरसता या संज्ञा-संकल्पना वरवर समानार्थी वाटल्या तरी त्यातील आशय आणि अन्वयार्थ वेगवेगळे आहेत. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर (1779) लिबर्टी (स्वातंत्र्य), इक्वॅलीटी (समता) आणि फ्रॅटर्निटी (बंधुत्व) या घोषणा एक तत्त्व म्हणून जगाच्या प्रगत इतिहासात रूजत गेल्या. परंतु त्या प्रत्यक्षात आणणे व्यक्तीगत व सामाजिक जीवनात सोपे नाही. किंबहुना अनेकदा समता आणि स्वातंत्र्य या संकल्पना तर परस्परविरोधात जातात. बंधुत्व हे तर किती कठीण आहे हे खुद्द फ्रान्समध्येच दिसून आले आहे. बंधुत्वाच्या मुल्यात सहिष्णुता, सहृदयता आणि आदरभावना अभिप्रेत आहेत. फ्रान्समध्ये कृष्णवर्णीयांना, इस्लाम धर्मीयांना आणि अन्य संस्कृती-समुदायांना कसे वागविले जाते हे पाहिले की फ्रान्सनेच ही मूल्ये टाकून दिली आहेत हे दिसून येते!

इतर कोणत्याही देशापेक्षा भारतात समता प्रस्थापित करणे हे एक प्रचंड मोठे आव्हान आहे. सर्वप्रथम एक सूत्र सर्वांनी (समाज, न्यायव्यवस्था, प्रशासन) मनापासून स्वीकारले तर ते आव्हान पेलता येईल. अर्थातच समता सर्वत्र प्रस्थापित करणे हे टप्प्या-टप्प्यानेच करावे लागेल, ते सूत्र म्हणजे जीवनाच्या सर्व क्षेत्रत सर्वांना समान संधी देणे. वरवर दिसते तेही सोपे नाहीच.

सर्वांना समान संधी म्हणजे चंद्रपूरच्या जंगलातील आदिवासीपासून ते चंदीगढच्या श्रीमंत कुटुंबातील व्यक्तीर्पयत आणि दीर्घकाळ अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीतील स्त्री-पुरूषांपासून ते सदाशिव पेठ- डोंबीवली- पार्ले येथील सवर्ण-ब्राह्मण मध्यमवर्गीय कुटुंबातील माणसार्पयत, तसेच सफाई कामगार आणि एखाद्या कंपनीतील जनरल मॅनेजर हेही त्याच समानतेच्या सूत्रात. अशा सर्वांना संधी समान पाहिजे. प्रश्न तेथूनच सुरू होतो. म्हणजे प्रत्येकाला साधारणपणे समान उत्पन्न, समान सामाजिक दर्जा, समान शिक्षण. घरसुध्दा सर्वांना फार तर 50 ते 150 चौरस फूट.

कारण मकान किती लहान वा मोठे? वन-रूमकिचन, पाच खोल्यांचा फ्लॅट, स्वत:चा बंगला, बाग-बगीचा, खासगी स्विमिंग पूल आणि बॅडमिंटन कोर्ट.. मकानाची व्याख्या कोणी आणि कशाच्या आधारे ठरवायची? तीच गोष्ट कपडय़ांची. अस्सल गांधीवादी म्हणतात, स्वत: कातलेल्या सुताचे कपडे, स्वच्छ पण अवघे दोन सेह्न का पाच-सहा डझनभर, दोन डझन - विविध रंगी, विविध ढंगी, तलम सिल्क, वुलन, टेरिकॉट इत्यादी? मोजक्याच चार शुभ्र, खादी साडय़ा का कपाटभरून तऱ्हेतऱ्हेच्या रंगसंगतीच्या साडय़ा?

तीच गोष्ट रोटीची. पोटाला आवश्यक तेवढे साधे जेवण-झुणका भाकर का दिवसातून चार-चार वेळा विविध चवींनी युक्त, अनेक प्रकारचे, चमचमीत, रसरशीत पदार्थ? गुलाबजाम, आईस्क्रीम, केक, फालुदा, पुरणपोळ्या, गरमगरम भजी, भाजणीचे थालीपीठ, बोनलेस बटर चिकन, तंदुरी चिकन, कबाब, पापलेट..

तेव्हा नुसते 'रोटी, कपडा, मकान' हे लोकांच्या गरजांचे वर्णन नाही. शिवाय रोटी, कपडा, मकान यात शिक्षण, आरोग्य, संस्कृती करमणूक, संशोधन, कथा-कविता- कादंबरी, रेडिओ - टीव्ही हे कुठेच येत नाही. जसे लोकांच्या गरजेचे वर्णन त्रिकालाबाधित, स्थळ-काळ निरपेक्ष करता येत नाही तसेच निसर्गाच्या क्षमतेलाही व्याख्यारूप करणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ, जमीन किती धान्य पिकवू शकते? किती वेळात? कोणत्या हवामानात आणि कोणत्या प्रकारच्या जमिनीत? विशिष्ट पिकाला, झाडाला किती पाणी लागते? किंवा आपल्या 'मकानासाठी' लागणारी वाळू, पाणी, सिमेंट तो निसर्ग कशा प्रकारे व किती पुरवू शके ल? मकान चांगले भक्कम सिमेंट काँक्रिटचे का भुसभुश्या मातीचे? त्या मकानात रोटी पकणार, तिला लागणारा कोळसा, रॉकेल, गॅस. निसर्ग कसा व कुठून पुरविणार? रोटी खाल्यानंतर पाणी प्यायला पाहिजे, ते पाणी निसर्ग पुरविणार का माणसालाच काही तजवीज करून निसर्गाची क्षमता ठरवावी लागणार? 'नदी तिथे गाव' अशी म्हण आहे. पण ती खरी नाही. कित्येक गावांच्या जवळ ना नदी ना सरोवर. मिझोरामध्ये तर पावसाचे पाणी साठवून सहा-आठ महिने काढतात. शिवाय मैलोन-मैल पसरलेल्या वाळवंटातही गावे आहेतच. हजारो वर्षांपूर्वी नदीजवळ पहिली गावे वसली म्हणून ही म्हण प्रचारात आली इतकेच. तर माणसांच्या (जगातील सर्व पाचशे कोटीहून अधिक माणसांच्या) गरजा भागविण्याएवढी निसर्गाची क्षमता आहे का? ती कशी ठरवणार? या क्षमतेचे मोजमाप काय? म्हणजेच गरजा आणि क्षमता आणि लोकसंख्या यांचे काळ-काम-वेगाचे गणित सोडविल्याशिवाय पर्यावरणाच्या प्रश्नाला सामोरे जाता येणार नाही. हे गणितही सारखे बदलत राहणार. कारण तिसऱ्या जगात (आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका) आणि मुख्यत: भारतीय उपखंडात दर दीड सेकंदाला एक मूल जन्माला येत आहे.

लोकसंख्येचा प्रश्न निसर्गाच्या क्षमतेवर सोडला तर या भूतलावर माणसांची इतकी गर्दी होईल की त्या गर्दीतच गुदमरून माणसे मरतील. म्हणजेच निसर्गाला मनमानी करून देऊन चालणार नाही. निसर्गाला आटोक्यात ठेवणे हे पर्यावरणशास्त्राचे एक काम आहे. 'जो जो निसर्गावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला' हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. आजही जगातील जवळजवळ अर्ध्याच्या आसपास लोकसंख्या निकृष्ट, मागासलेले, दरिद्री जीवन जगते आहे. जेफ्री सॅक्स हा विख्यात अर्थतज्ज्ञ असे म्हणतो की, दरवर्षी सुमारे ऐंशी लाख लोक दारिद्र्याच्या खाईत सापडल्यामुळे मरण पावतात. दररोज साधारणपणे आठ हजार मुले मलेरियाची बळी होतात. पाच हजार माता क्षयरोगाने मृत्युमुखी पडतात. सुमारे साडेसात हजार तरूण एड्समुळे मरण पावतात. याव्यतिरिक्त हजारो जण हगवणीने, श्वासनलिकेच्या रोगाने व अन्य साथींनी मृत्युमुखी पडतात. लाखो गरिबांना औषध मिळाले नाही म्हणून, आरोग्याच्या सुविधा मिळाल्या नाहीत म्हणून वा साधे, शुध्द पाणी व हवा न मिळाल्यामुळे मरणासन्न स्थितीत असतात. म्हणजेच आजच्या 'सिव्हिलाईज्ड' म्हणजे प्रगत स्थितीत समाज असतानाही बहुसंख्यांना जगण्यासाठीच संघर्ष करावा लागतो. जसा काही हजार वर्षापुर्वी करावा लागत होता तसा!

सॅक्स यांच्या अर्थ-गणितानुसार अमेरिका या एकाच देशाचा लष्करावरचा खर्च 450 अब्ज डॉलर्स इतका आहे. कशासाठी तर शांतता प्रस्थापित करण्यासाठी! परंतु फक्त 15 अब्ज डॉलर्स जर अमेरिकेने दरवर्षी बाजूला काढले (म्हणजे अमेरिकेच्या दर 10 डॉलर उत्पन्नापैकी केवळ 15 सेंट्स) तर जगातील दारिद्र्याचे निर्मूलन होईलच, शिवाय जग दहशतवादापासून मुक्त होईल. जगातील दहशतवादाचे एक महत्वाचे कारण अथांग दारिद्र्य आहे, असे सॅक्सचे म्हणणे. असो.

शिवाय समता ही एखाद्या देशापुरतीच प्रस्थापित करता येणार नाही. आजच युरोप-अमेरिकेत स्थायिक झालेले काही 'अनिवासी भारतीय' स्वत:ला 'विशेष कुणीतरी' मानतात. एकदम सोपे उदाहरण घेऊ या : आजचा एक डॉलरचा विनिमय दर 64 रूपये आहे. म्हणजे जो भारतीय अमेरिकेत तीन हजार डॉलर पगार कमावतो, तो भारतीय चलनानुसार दरमहा दोन लाख रूपये मिळवतो. त्याने त्याच्या आईवडिलांना दरमहा फक्त तीनशे डॉलर्स (त्याच्या तीन हजार डॉलर्स पगाराच्या एक दशांशच!) पाठवले तर त्याचे भारतात सुमारे 20 हजार रूपये होतात. पण हा विनिमय

दर बदलला आणि डॉलरला पूर्वीप्रमाणे (1980 च्या दशकात) वीस रूपयांच्या आसपासच मिळू लागले तर त्याचा तेथील पगार भारतीय चलनाच्या परिभाषेत फक्त साठ हजार होईल आणि त्याच्या आईवडिलांना तो फक्त सहा हजार (30 डॉलर्स 20 रूपये दराने) पाठवू शकेल. म्हणजे या अनिवासी भारतीयाचा फायदा रूपयाचे अवमूल्यन होण्यात आहे.  याउलट भारतीयाचे नुकसान आहे. पण त्याहून महत्वाचा मुद्दा म्हणजे त्याच समान कामाचे भारतातील वेतन अमेरिकेच्या बरेच कमी असणार म्हणजे एकाच स्वरूपाच्या कामासाठी अमेरिकन कंपनीत काम करणाऱ्या अनिवासी भारतीयाला दोन लाख रूपये (तीन हजार डॉलर) पगार असेल तर त्याच प्रकारचे काम करणाऱ्या भारतात 4 ते 5 हजार रूपयेच मिळतील. म्हणजे 'समान कामाला समान वेतन' या न्याय्य मागणीची पुरेपुर वाट लागणार असो. समानतेचा मुद्दा वाटतो तेवढा सोपा नाही . सामान्य माणसाचे 'सामान्यपण' समानतेवर अवलंबून आहे!

**संपत्ती आणि भूक**

एका बाजूला जगात प्रचंड प्रमाणात संपत्ती वाढताना आपण पाहतो आहोत आणि दुसऱ्या बाजूला त्याहूनही प्रचंड प्रमाणात दारिद्र्य आहे, असे जेफ्री सॅक्स हा विख्यात अर्थतज्ज्ञ  म्हणतो,  त्याचे प्रमाण रोजच मिळते. जेफ्रीच्या म्हणण्यानुसार जगातील संपत्तीचे, उत्पन्नाचे आणि सुविधांचे मानवतावादी दृष्टिकोनातून नियोजनच झालेले नाही. तसे नियोजन झाले तर पुढील 2 वर्षात जगात कुणीही उपाशी राहणार नाही, निरक्षर राहणार नाही. दारिद्र्यातून उद्भवणाऱ्या रोगांना बळी पडणार नाही, बाळ-बाळंतिणी अनवस्थेमुळे मृत्युमुखी पडणार नाहीत, लहान मुले बेवारशी फिरणार नाहीत आणि जगात कुणी भुकेकंगाल राहणार नाही.

पण हे समानतेचे स्वप्न बरेच अवघड,  गुंतागुंतीचे आहे.

लोकमतच्या सौजन्याने

ketkar.kumar@gmail.com

• • •

# इस्लामवादी दहशतवाद: पडद्यामागचे राजकारण

*डॉ. राम पुनियानी*

राजकारण......जात-धर्म.....समाजकारण

इस्लामच्या नावावर गेल्या अनेक वर्षांपासून जगाने हिंसा आणि दहशतवादाच्या असंख्य घटना झेलल्या आहेत. यातील अनेक इतक्या क्रूर आणि माथेफिरूपणाच्या आहेत की, ना त्या विसरल्या जाऊ शकतात, ना त्यांना माफ करता येते. ओसामा-बिन-लादेनने योग्य ठरविलेल्या 9/11च्या हल्ल्यात 3000 निरपराधी व्यक्तींचे मृत्यू, पेशावरमधील शालेय मुलांवरील हल्ला, बोकोहरमद्वारे केलेले शाळेतील मुलांचे अपहरण, चार्ली हेब्दोवरील हल्ला आणि आयसिसद्वारे केल्या गेलेल्या घृणास्पद हत्या इत्यादी हल्ले यात सामील आहेत. या सर्व घटना घोर निंदा करण्यास पात्र आहेत आणि त्या साऱ्या सभ्य समाजाला शरमेने मान झुकविण्यास बाध्य करणाऱ्या आहेत.

'इस्लामिक दहशतवाद' हा नवा शब्दसमूह 9/11च्या हल्ल्यानंतर प्रचलित करण्यात आला. हा शब्द इस्लामला सरळ दहशतवादाशी जोडतो. इस्लामवादी दहशतवाद बऱ्याच काळापासून सुरु आहे आणि साऱ्या जगात कर्करोगासारखा पसरत आहे, हे खरे आहे. इस्लामच्या नावे वारंवार होत असलेले हिंसक आणि दहशतवादी हल्ले होत असल्याने, याचा संबंध इस्लामशी आहे, असे प्रतीत आहे. हीच गोष्ट अमेरिकन प्रसारमाध्यमे अनेक वर्षांपासून प्रसारित करत आली आहेत आणि हळूहळू अन्य देशातील प्रसारमाध्यमांनीही हाच राग आळविणे सुरु केले आहे. एक अगदी साधारणसा प्रश्न हा आहे की, जर या घटनांचा संबंध इस्लामशी आहे, तर या घटना मुख्यत: तेल उत्पादक देशातच का होतात?

या समाजव्याप्त भ्रमाला पुढे नेत, अनेक लेखकांनी इस्लाममध्ये सुधारणा घडवून आणल्यास, या समस्येचे निराकरण होईल असा तर्क केला आहे. इस्लामला अतिरेकी प्रवृत्तींपासून मुक्त करण्यासाठी 'धार्मिक क्रांतीची' गरज आहे, असे काहींचे म्हणणे आहे. इस्लामवर, हिंसा आणि दहशतीवर विश्वास असणाऱ्या कट्टरपंथी तत्त्वांचे वर्चस्व स्थापित झाले आहे, असेही म्हटले जात आहे. म्हणून इस्लाममध्ये सुधारणा झाल्यास हिंसा संपून जाईल. प्रश्न हा आहे की, कट्टरपंथियांमागे अशी कोणती ताकद आहे, की ज्या भरवशावर, इस्लाम एक शांतिपूर्ण धर्म, या रूपाने असलेल्या इस्लामची व्याख्या नाकारता येईल. ती ताकद इस्लाम आहे काय? की इस्लामचा मुखवटा घातलेले राजकारण आहे? या काळात जगभरात इस्लामच्या नावे जी हिंसा होत आहे, तो मानवतेच्या इतिहासातील एक कलंकित अध्याय आहे, आणि त्याची केवळ निंदा करून चालणार नाही, तर त्याला मुळातून उखडून टाकण्याचे प्रयत्न व्हायला हवेत, यावर कोणतेही दुमत नाही.

इस्लामवादी दहशतवादी, मानवतेचे शत्रू बनून गेले आहेत. परंतु आपल्याला हे सारे प्रकरण समजून घेण्याची, आणि जे केवळ वरवर दिसते, त्या आधारावर आपले मत न बनविण्याची गरज आहे. यामागे कोणत्या शक्ती आहेत, हे समजून घ्यायचा प्रयत्न केला पाहिजे. केवळ सैद्धांतिक सुधारणा करून 'तेलाच्या राजकारणाचा' सामना करता येवू शकेल - त्या राजकारणाचा, ज्याला चोरून-लपून काही निहित स्वार्थ समर्थन देतात, कारण ते कोणत्याही मार्गाने आपले ध्येय साध्य करू इच्छितात. ज्या राजकारणाने, इस्लामच्या नावावर या प्रकारच्या हिंसक प्रवृत्तींना जन्म दिलाय, ते राजकारण आपण ओळखायला हवे आणि त्याला उघडे पाडायला हवे.

मौलाना वहिदुद्दिन खान, असगर अली इंजिनिअर आणि अन्य व्यक्तींनी, दहशतवाद जगाच्या एका भागातून दुसऱ्या भागात फैलावत असताना आणि अत्यंत क्रूरतापूर्ण व कुत्सित दहशतवादी कारवाया सुरु असताना, इस्लामचा मानवतावादी चेहरा जगासमोर ठेवला. इस्लामची मानवतावादी तत्त्वे मुख्य प्रवाहात का येत नाहीत? कट्टरपंथी लोक इस्लामच्या संस्करणाचा वापर हिंसा आणि अमानवी कार्ये करण्यासाठी करीत आहेत आणि इस्लामचे औदार्यवादी आणि मानवतावादी विचार बाजूला सरकविले जात आहेत. कुराणचा वेगवेगळा अर्थ लावला जात नाही, असेही नाही. आणि तर्कवादी आंदोलने नाहीत असेही नाही. परंतु जगातील तेलाच्या साठ्यावर कब्जा करण्याच्या राजकारणाने दहशतवादाचे उत्पादन करणारे कारखाने स्थापन केले आहेत आणि औदार्यवादी आणि मानवतावादी आवाज पूर्णपणे दाबून टाकला जात आहे. आर्थिक-राजकीय कारवाया सुरु असल्यामुळे इस्लामचे मानवतावादी रूप कमजोर पडले आहे.

वर्चस्ववादी राजकीय शक्ती, त्यांच्या राजकीय आणि आर्थिक कार्यक्रमाला अनुरूप असलेला धर्माचा तो भाग निवडतात आणि त्यावर भर देतात. कुराणच्या त्या आयती संदर्भापासून बाजूला करून इस्लामच्या मुखवट्याआड लपलेले राजकीय उद्देश लपवून ठेवले जातात. काही मुसलमानांना काय म्हणायचे ते म्हणू द्या, परंतु दहशतवाद आणि धन प्राप्त करण्यासाठी इस्लामचा केला जाणारा वापर ही समस्या आहे. आपल्याला, कट्टरवाद आणि दहशतवाद, जो इस्लामच्या नावे औचित्यपूर्ण ठरविला जात आहे, त्याचा उदय आणि त्याच्या मजबूत होत जाण्यामागच्या कारणांना समजावे लागेल. 'काफिरांना मारून टाकायला हवे' याची चर्चा चहूकडे सुरु असताना, सर्व माणसे एक-दुसऱ्यांचे भाऊ आहेत आणि इस्लामचा अर्थ शांती आहे, या इस्लामच्या शिकवणुकीला काहीच महत्त्व नाही, याचे काय कारण आहे.

दहशतवादाची पाळेमुळे पश्चिम आशियातील तेल भांडारांवर कब्जा करण्याच्या राजकारणात आहेत. अमेरिकेने अल कायदाला समर्थन आणि उत्तेजन दिले. पाकिस्तानात असे मदरसे स्थापन केले गेले, की त्यात इस्लामच्या वहाबी संस्करणाचा उपयोग जिहादींची फौज तयार करण्यासाठी करण्यात आला, जेणे करून, अफगाणीस्तानातील रशियन सैन्याशी सामना करता यावा. अमेरिकेने अल कायदाला 800 कोटी डॉलर्स आणि 7,000 टन हत्यारे उपलब्ध करून दिली, त्यात स्टिंगर क्षेपणास्त्रेही सामील होती. व्हाइट हाउसमध्ये झालेल्या एका पत्रकार परिषदेत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रेगन यांनी अल कायदाच्या जन्मदात्यांना अमेरिकेच्या संस्थापकांच्या बरोबरीचे म्हटले होते. इराकमध्ये

लोकशाही पद्धतीने निवडून आलेले मोसाडेग सरकार 1953मध्ये उचलून फेकून देण्यात आले. त्याबरोबर घटनाचक्र सुरु झाले. त्याने इस्लामच्या हिंसक रुपाची चर्चा सुरु झाली आणि त्याचा मानवतावादी-उदारवादी चेहरा विसरला गेला. मौलाना रुमींनी, शांती आणि प्रेम, यांना इस्लामच्या सुफी संस्करणाची केंद्रीय तत्त्वे म्हणून निरुपित केली होती. मग असे काय झाले की, आज जगावर इस्लामचे वहाबी रूप लादले गेले आहे? इस्लामचे खलाफी रूप दोन शतकांपासून अस्तित्त्वात होते, परंतु त्याचा उपयोग गेल्या काही दशकांपासून होतोय, याचे काय कारण आहे? विनाकारण हिंसा आणि लोकांचे जीव घेण्यात लिप्त असलेल्या तत्त्वांचा जाणूनबुजून इस्लामच्या या संस्करणात उपयोग केला गेला, कारण त्याने त्यांचे राजकीय उद्देश साध्य व्हावेत.

धर्माचा उपयोग नेहमीच सत्ता मिळविण्यासाठी केला जातो, याला इतिहास साक्ष आहे. राजा आणि बादशहा क्रुसेद, जिहाद, धर्मयुद्ध या नावांनी आपले स्वार्थ साधत आले आहेत. भारतात ब्रिटीश राजवटीत अस्त होत चाललेल्या जमीनदार आणि राजे (हिंदू-मुसलमान दोन्ही धर्मातील) या वर्गाने मिळून युनायटेड इंडिया पॅट्रिअटिक असोसिएशनची स्थापना केली आणि याच संस्थेतून मुस्लिम लीग आणि हिंदुमहासभा निर्माण झाली. सांप्रदायिक संस्थांनी घृणा फैलावली. त्यातून सांप्रदायिक हिंसा भडकली. युनायटेड इंडिया पॅट्रिअटिक असोसिएशनचे संस्थापक होते ढाक्याचे नबाब आणि काशीचा राजा. आता आपण मुस्लिम लीग, हिंदुमहासभेसारख्या जातीयवादी संघटनांच्या निर्मितीसाठी हिंदू आणि मुस्लिम धर्माला दोषी ठरविणार आहोत?, की ज्या राजकारणासाठी या जमीनदार आणि राजांनी इस्लाम आणि हिंदू धर्माचा वापर केला, त्यांना दोषी ठरविणार आहोत? आपण सध्या, दक्षिण आशियात म्यानमार आणि श्रीलंकेत बौद्ध धर्माच्या नावे गठीत झालेल्या गटांच्या कारवाया पाहात आहोत.

थोडे लक्षपूर्वक पहिले तर आपल्या हे लक्षात येईल, की इस्लामी दहशतवाद, इंडोनेशियासारख्या मोठी मुस्लिम लोकसंख्या असलेल्या देशात न वाढता, मुख्यतः तेल उत्पादक देशात वाढला आहे. दहशतवादाचे बीज कुण्या धार्मिक नेत्याने पेरलेले नाही, ते तेलाचे भोक्ते असलेल्या महाशक्तींनी पेरले आहे. सौदी अरेबियाच्या वाळवंटात कुठे पडून असलेली मौलाना वहाबींची इस्लामची व्याख्या खोदून काढण्यात आली आणि तिचा उपयोग सध्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी करण्यात आला. राजकीय शक्ती, त्यांच्या हिताला अनुकूल असणारा धर्माचा भाग निवडतात. काही लोक मुलींसाठी शाळा उघडत आहेत. ते असे म्हणतात की, ते ही गोष्ट कुराण ज्ञानाला फार महत्त्व देतो, म्हणून करीत आहेत. दुसरीकडे त्याच कुराणाचा आधार घेवून कुणी शाळेत जाणाऱ्या मुलींवर गोळ्या झाडत आहेत. दहशतवादी समूह, धर्माच्या आपल्या संस्कारणावर ना चर्चा करू इच्छितात ना करू शकतात. त्यांना फक्त त्यांनी निवडलेल्या वचनांशी मतलब आहे, जे त्यांच्या डोक्यात ठोसून दिले आहेत आणि ज्यांनी त्यांना हातात बंदूक आणि बॉम्ब असलेले जनावर बनविले आहे.

हिंदू धर्माच्या नवे गांधीजींनी अहिंसेला आपला मुख्य आदर्श मानले. त्याच हिंदू धर्माच्या नावे गोडसेने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. या सर्वात धर्म कुठे आहे? सध्या जगवारचे संकट बनलेल्या इस्लामवादी दहशतवाद्यांना अमेरिकेने स्थापन केलेल्या मदरशांमधून शिक्षण मिळाले आहे. आयसिस अतिरेक्यांमागे अमेरिका असू शकते, अशीही बातमी आहे. साम्राज्यवादाच्या काळातही राजकारणावर वेगवेगळ्या धर्मांची लेबले लागलेली असत. साम्राज्यवादी शक्ती नेहमीच सामंती व्यवस्था जिवंत ठेवीत होती. आता तेल उत्पादक क्षेत्रातील मुख्य रहिवासी मुसलमान आहेत, म्हणून इस्लामचा वापर राजकीय ध्येय प्राप्त करण्यासाठी केला जात आहे. विडंबना ही आहे की, मुसलमान आपल्याच संपदेचे - काळ्या सोन्याचे शिकार होत आहेत.

ram.puniyani@gmail.com

• • •

# संघ बदलला की दलित विचारवंत?

*बी. व्ही. जोंधळे*

जात-धर्म.....चिकित्सा.....समाजकारण

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमांना राज्यातील काही दलित साहित्यिकांनी उपस्थिती लावली. अशा कार्यक्रमांमुळे, भाजप-संघ परिवाराची हिंदू राष्ट्रनिर्मितीची संकल्पना स्पष्ट असताना, तेथे जाऊन दलित विचारवंत कुणाचे नि कसले प्रबोधन करतात? दलित लेखक, विचारवंत, वा कवी सांगत असलेला आंबेडकरवाद संघ परिवार स्वीकारतो काय? असे प्रश्न उपस्थित होतात.

केंद्रात आणि राज्यात भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारे सत्तारूढ झाल्यानंतर संघ आणि संघ परिवाराशी संलग्न असणाऱ्या संघटनांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेमाचा पान्हा फुटलेला पाहावयास मिळतो आहे. उदाहरणार्थ संघ परिवाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साजरी केलेली जयंती, संघाचे मुखपत्र असलेल्या 'पांचजन्य' व 'ऑर्गनायझर'ने आंबेडकर जयंतीनिमित्त प्रसिद्ध केलेले विशेषांक, 'ऑर्गनायझर' व 'पांचजन्य'ने आयोजित केलेल्या कार्यक्रमास; तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या व्याख्यानमालेस दलित समाजातील एक विचारवंत डॉ. नरेंद्र जाधव यांनी लावलेली हजेरी.

केंद्राच्या साहित्य अकादमीला पुढे करून निवडक दलित साहित्यिकांचे दिल्लीत सांस्कृतिक विभागाने घडवून आणलेले चर्चासत्र, राज्य सरकारच्या वतीने गेट वे ऑफ इंडिया येथे साजरी करण्यात आलेली आंबेडकर जयंती वगैरे बाबासाहेबांची जयंती संघ परिवाराने साजरी केली असेल, तर त्यात आक्षेप घेण्यासारखे काहीही नाही. कारण बाबासाहेब ही काही कुणाची खासगी मालमत्ता नव्हे. काँग्रेसने आजवर दलितांची मते मिळविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा राजकीय वापर केला. भाजप आता काँग्रेसचाच कित्ता गिरवत असेल, तर नवल नव्हे. मात्र, काँग्रेसपेक्षा संघ परिवाराची खरी अडचण अशी की, त्यांच्याकडे कोणता राष्ट्रीय नायकच नसल्यामुळे त्यांना नाइलाजाने गांधी, डॉ. आंबेडकरांचे नाव घ्यावे लागत आहे. आता मुद्दा असा की, संघ परिवाराने राजकीय सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात गांधी, डॉ. आंबेडकरांचे विचार कितपत स्वीकारले आहेत? राष्ट्रीय नेत्यांच्या विचारांशी प्रामाणिक मतभेद असणे समजू शकते, पण जिथे परिवर्तनाच्या संदर्भात टोकाचे परस्परविरोधी सैद्धांतिक मतभेद असतात, तिथे भाजप संघ परिवाराने आंबेडकर वा गांधीजींचे नाव घेणे म्हणजे दलित बहुजन समाजाची दिशाभूल करणेच नव्हे काय?

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने 1980मध्ये आम्ही गांधीवाद स्वीकारला, असे म्हटले होते. पुढे एका वर्षानंतर आम्ही गांधीवाद स्वीकारला नाही, असे संघानेच घोषित केले. आता संघ आयोजित कार्यक्रमातून सांगण्यात येते, की आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वीकार केला आहे. प्रश्न असा की, संघाने आंबेडकरवाद स्वीकारला म्हणजे नेमके काय केले? संघास बाबासाहेबांचा जातिअंताचा लढा मान्य आहे काय? या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित होतात ते असे.

बाबासाहेबांनी जातीव्यवस्थेच्या इतिहासाची नव्याने मांडणी करताना म्हटले, 'भारतात समता स्वातंत्र्य, बंधूभावाचा विचार देणाऱ्या बौद्ध धर्माचा उदय ही एक क्रांती होती व बौद्ध धर्माचा पाडाव ही प्रतिक्रांती होती. बौद्ध धर्माला पराभूत करण्यासाठीच रामायण, महाभारत, भगवद्गीता, मनुस्मृती व पुराणे रचली गेली. या प्रतिक्रांतीने वर्ण आणि जातीव्यवस्था जन्मास घतली.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'जातीव्यवस्था नष्ट करावयाची, तर जाती व्यवस्थेचा आधार असलेल्या धर्मग्रंथाचे पावित्र्य नाहीसे करावे लागेल.' आता भाजपच्या राज्यात रामायण, महाभारत, गीतेचाच अभ्यासक्रमात समावेश करण्यात यावा, अशी भाषा जेथे हिंदुत्ववादी परिवाराकडून उच्चारली जाते. तेथे संघ परिवाराने बाबाबसाहेबांचा स्वीकार केला, अशी लोणकढी थाप मारणे म्हणजे शुद्ध लबाडीचे नव्हे काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिअंताच्या बाबत म्हटले, 'जो हिंदू धर्म माणसाच्या माणुसकीला किंमत देत नाहीत, अस्पृश्यता शिक्षण घेऊ देत नाही, देवळात जाऊ देत नाही, पाणी पिऊ देत नाही, असा हिंदू धर्म नाकारून समता, स्वातंत्र्य बंधुभावाचा पुरस्कार करणारा बौद्ध धर्म स्वीकारल्याशिवाय भारतीय समाजाची जातीव्यवस्थेतून मुक्तता होणार नाही.' बाबासाहेब आंबेडकरांची ही हिंदू धर्म मिमांसा संघ परिवारास मान्य आहे काय?

संघ परिवाराच्या विश्व हिंदू परिषदेकडून असे सांगण्यात येते की, हिंदू समाजात कोणतीही अस्पृश्यता नाही. आता प्रश्न असा की अस्पृश्यता ही जर हिंदू धर्म संमत नसेल, तर मग एखाद्या हिंदू दलिताची नेमणूक शंकराचार्यांच्या पदावर का केली गेली नाही? बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते, 'शंकराचार्यांच्या गादीवर एखादा संस्कृत भाषेत तज्ज्ञ असलेला दलित बसविण्याची हिंदू धर्मियांची तयारी असेल, तर मी धर्मांतराचा विचार सोडून देईन.' धर्मांतर टाळण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा हा विचार संघ परिवार अजूनही कृतीत का आणत नाही?

अस्पृश्यांना सक्षम करण्याची भाषा जेव्हा हिंदूत्ववादी परिवाराकडून होते तेव्हा प्रश्न असा की, आजही जेथे खेडोपाडी दलित समाजावर क्रूर, अमानवी अत्याचार होतात, त्यावेळी संघ परिवार स्वकीयांविरुद्ध का लढत नाही? अमेरिकेत कृष्णवर्णियांना मानवी हक्क मिळावेत, म्हणून गौर वर्णीयही लढले. काळ्यांच्या बाजूने गोऱ्यांनी उभा केलेला लढा हा केवळ शब्दिक बुडबुडा नव्हता, तर काळ्यांच्या मानवी हक्कांसाठी गोऱ्यांनी गोऱ्यांविरुद्ध यादवी युद्ध पुकारले होते. दलितांवरील अत्याचाराबाबत अशी कुठलीही विद्रोही मानवतावादी भूमिका न घेणाऱ्या संघ परिवाराने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती साजरी करणे म्हणजे दलितांच्या डोळ्यात धूळफेक करणेच नव्हे काय?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे धर्मनिरपेक्षतेचे पुरस्कर्ते होते; पण भाजपच्या राज्यात आज धर्मांध उन्मादी वातावरण निर्माण करण्याचे उपद्याप हिंदुत्ववादी परिवाराकडून केले जात आहेत. हिंदू धर्म संकटात असल्यामुळे हिंदूंनी भरमसाठ मुले जन्माला घालावीत. भारत हे हिंदू राष्ट्र आहे. मुस्लिमांचा मतदानाचा अधिकार काढून घ्यावा, मुसलमानांचा लव्ह जिहाद थोपवावा, मोदींना विरोध असणाऱ्यांनी पाकिस्तानात जावे, अल्पसंख्याकांनी दुय्यम दर्जाचे नागरिक म्हणून राहावे, साईबाबा हे मुस्लिम असल्यामुळे त्यांची पूजा करू नये, नथुराम गोडसे हा देशभक्त होता, अभ्यासक्रमात हिंदू धर्मग्रंथांचा समावेश करावा, शाळेत सरस्वतीपूजन व्हावे, सूर्यनमस्कार सक्तीचे करावेत, अशी बेछूट धर्मांध भाषा वापरतानाच दुसरीकडे घरवापसीसारखे समाजात दुही पेरणारे कार्यक्रम घेण्यात येऊ लागले आहेत. चर्चवर हल्ले होत आहेत. हिंदुत्ववाद्यांचे हे प्रकार आंबेडकरवादात बसतात, असे संघ परिवारास वाटते काय?

आता थोडेसे दलित साहित्यिक-विचारवंतांविषयी. संघ परिवाराने आयोजित केलेल्या कार्यक्रमास डॉ. नरेंद्र जाधव उपस्थित राहतात. इतकेच नव्हे तर संघात आणि दलित समाजात सेतू म्हणून भूमिका बजावण्याची आपली तयारी आहे, असेही सांगतात. दुसरीकडे केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेल्या दलित साहित्यिकांच्या चर्चासत्रास महाराष्ट्रातून काही दलित साहित्यिक उपस्थित राहतात, याचा अर्थ काय?

भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक व्यक्तीला अभिव्यक्ती स्वातंत्र्य असल्यामुळे काही दलित विचारवंत, लेखक जर केंद्र सरकारच्या सांस्कृतिक विभागाने आयोजित केलेल्या चर्चासत्रास वा संघ पुरस्कृत संघटनांच्या कार्यक्रमांना हजर राहिले, तर त्यांचे ते स्वातंत्र्य मान्य केले पाहिजे. मात्र, भाजप-संघ परिवाराची हिंदू राष्ट्रनिर्मितीची संकल्पना स्पष्ट असताना, तेथे जाऊन दलित विचारवंत कुणाचे नि कसले प्रबोधन करतात? दलित लेखक, विचारवंत, वा कवी सांगत असलेला आंबेडकरवाद संघ परिवार स्वीकारतो काय? नाही. मग काही दलित लेखक-विचारवंतांचे संघ पुरस्कृत कार्यक्रमास जाण्याचे प्रयोजन ते काय? त्यांचे जाणे निर्हेतूक असते की, सहेतूक असते? पण संघप्रेमी दलित विचारवंत, लेखकांनाच तरी दोष का द्यावा? सर्वांना आज सत्तेची आणि पदांची घाई झाली आहे. दलित नेते म्हणूनच आजवर काँग्रेसच्या नादी होते, आता ते भाजप-सेनेकडे आहेत. काही दलित विचारवंत-लेखकांचेही असेच होत आहे. आंबेडकरी चळवळीची ही पिछेहाटच आहे, दुसरे काय?

महाराष्ट्र टाइम्सच्या सौजन्याने

# 'अस्तित्त्वाच्या प्रश्नांना विज्ञानाची उत्तरे'

*भालचंद्र काळीकर*

परीक्षण....विज्ञान....विवेक

आपल्या भोवतालची संपूर्ण सजीवसृष्टी "आहार, निद्रा, भय मैथुनं च" या चार प्राथमिक प्रेरणांच्या चौकटीत वावरत असते. मानवही त्याला अपवाद नाही. परंतु त्या चौकटीबाहेर पाऊल टाकून आजूबाजूच्या सृष्टीची ओळख करून घेणे विकसनशील बुद्धी असलेल्या मानवालाच जमले आहे. सर्व सृष्टीची माहिती करून घेण्याच्या उत्सुकतेपोटी त्याने अनेक ज्ञानशाखा विकसित केल्या. प्रत्येक शाखा वेगवेगळ्या विषयांचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत असते. अशाच एका ज्ञानशाखेने विषय निवडला, "सजीवांची निर्मिती आणि विकास." सजीवांच्या उत्पत्तीविषयींचे कुतूहल माणसाला फार प्राचीन काळापासून वाटत आले आहे. अनेक संस्कृतींनी , तत्त्ववेत्त्यांनी, धर्मग्रंथांनी ह्या विषयाचा वेध घेणाचा प्रयत्न केला आहे. पण केवळ कल्पनेशिवाय अन्य कोणतेही साधन जवळ नसल्यामुळे त्यांच्या हाती कांही लागले नाही. एक प्रकारची गोंधळाची स्थिती सर्व वैचारिक जगतात होती.

परंतु 1859 साली चार्ल्स डार्विनचा " दि ओरिजिन ऑफ स्पीसीज" हा ग्रंथ प्रसिद्ध झाला आणि सर्वच स्थिती पालटून गेली. नैसर्गिक निवडीच्या आधाराने सर्व सजीवांची उत्क्रांती झाली आहे असा सिद्धान्त डार्विनने मांडला. या सिद्धांताचा पुढे अनेक शास्त्रज्ञांनी सखोल व सप्रयोग अभ्यास करून विस्तार केला. अनेक ग्रंथ जगाच्या सर्वच भाषांतून ह्या विषयावर प्रसिद्ध झाले. मराठीतही बरीच पुस्तके ह्या बाबतीत उपलब्ध आहेत. त्यांतच अलीकडे एका सुंदर पुस्तकाची भर पडली आहे."गोफ जन्मांतरीचे (अस्तित्वाच्या प्रश्नांना विज्ञानाची उत्तरे)." हेच ते पुस्तक. लेखिका आहेत कराडच्या डॉ.सुलभा ब्रह्मनाळकर. विषयाचा सखोल अभ्यास करून, अनेक ग्रंथांचे परिशीलन करून व त्यांना आपल्या तर्कशुद्ध चिंतनाची जोड देऊन डॉ. ब्रह्मनाळकरांनी एक देखणे पुस्तक वाचकांच्या हाती दिले आहे.

अगदी प्रस्तावनेपासूनच पुस्तक वाचकाच्या मनाची पकड घेते. पारंपरिक दृष्टिकोन सोडून जगाकडे पाहण्याचा एक वेगळा परंतु सत्यनिष्ठ दृष्टिकोनही असू शकतो हे प्रस्तावनेमधून वाचकाच्या मनावर ठसायला सुरवात होते.

पुस्तकाच्या सुरवातील डार्विनविषयी वैयक्तिक माहिती, त्याचा जगप्रवास, त्याने केलेला सजीवांचा अभ्यास व मांडलेला सिद्धांत, डार्विनचे समकालीन तसेच त्याच्यानंतर झालेले शास्त्रज्ञ, त्यांनी मांडलेल्या उपपत्ती आणि सिद्धांताचा केलेला विस्तार इत्यादि सर्व गोष्टींचे थोडक्यात पण सर्वस्पर्शी विवेचन लेखिकेने केले आहे. त्याच बरोबर एकाच आदिपूर्वजापासून ते थेट आजच्या मानवापर्यंत सजीवांची उत्क्रांती कशी होत गेली, जीवसृष्टीच्या वंशवृक्षाला वेगवेगळ्या फांद्या कशा फुटत गेल्या, नैसर्गिक निवडीच्या चाळणीतून टिकून राहिलेल्या सजीवांच्या निरनिराळ्या जाती, प्रजाती कशा निर्माण झाल्या याचे सुंदर , सचित्र वर्णन लेखिका करतात.

सूक्ष्मदर्शकासारख्या आधुनिक उपकरणांच्या अभावी डार्विनच्या काळात अनुत्तरित राहिलेल्या प्रश्नांची नंतरच्या शास्त्रज्ञांनी शोधून काढलेली उत्तरे नेटक्या पद्धतीने लेखिकेने मांडली आहेत. आर्.एन्.ए., डी.एन्.ए., गुणसूत्रे (क्रोमोसोम्स), जनुके(जीन्स), जिनोम आदि पारिभाषिक संज्ञांचे अर्थ उत्कृष्टपणे समजावून सांगितले आहेत. क्रीक-वॅटसन ह्या शास्त्रज्ञांच्या शोधांमध्ये आनुवंशिकतेच्या कणांच्या रेण्वीय रचनेचा अंतर्भाव आहे. तर नीरेन्बर्ग-खुराणांना पेशींमध्ये असलेल्या गुणसूत्रांमधील माहितीचा माग लागला. ह्या गुणसूत्रांमध्येच सजीवाचा संपूर्ण इतिहास दडलेला असतो असे आढळून आले. ह्या इतिहासावर म्हणजेच "जिनोम" वर पुस्तकाचे रूपक कल्पून लेखिकेने ते आपल्या ग्रंथात सर्वदूर खेळविले आहे. त्यामुळे विषय समजणे वाचकांसाठी फारच सोपे झाले आहे. आपल्या नेहमीच्या पुस्तकात ज्याप्रमाणे प्रकरणे, परिच्छेद, वाक्यें, शब्द, अक्षरे असतात तशीच याही पुस्तकात आहेत. फक्त त्यांची भाषा सांकेतिक असते. ही जनुकांची भाषा आहे. अनेक शास्त्रज्ञांनी मोठ्या परिश्रमांनी ह्या संकेतांची उकल करण्यात यश

मिळविले. ही उकल होऊन पुस्तकाचे "वाचन " होताच अलीबाबाच्या गुहेचे दार उघडल्यासारखे झाले. सजीवसृष्टीच्या उत्क्रांतीचा संपूर्ण इतिहास दृष्टिक्षेपात आला. पृथ्वीवरील अणुरेणु आणि त्यांची जोडणी करणारे भौतिक नियम हेच या पुस्तकाचे "लेखक" आहेत. व त्यांतील आज्ञावलींना अनुसरूनच सर्व सृष्टीचे व्यवहार चालतात. अन्य कुणाकडेही सृष्टीचे कर्तृत्व आणि चालकत्व जात नाही. असे डॉ.ब्रह्मनाळकर निक्षून सांगतात. पटवूनही देतात. ह्याच नियमांनुसार डी.एन्. ए. व प्रथिने यांचे रूपांतर सजीवांच्या शरीरात होते असे त्या वैज्ञानिक प्रयोगांचे संदर्भ देऊन सांगतात.

उत्क्रांतीच्या इतिहासाचे फारच मनोज्ञ वर्णन लेखिकेने केले आहे."ल्यूका" (लास्ट युनिव्हर्सल कॉमन ॲन्सेस्टर) ते माणूस हा प्रवास कसा झाला हे त्यांनी सुबोध पद्धतीने स्पष्ट करून दाखविले आहे. नैसर्गिक निवडीचे तत्त्व सर्व सजीवांना लागू असून त्याला अनुसरूनच सजीवसृष्टी उत्क्रान्त झाली. ह्या 'चाळणी'तून निवडले गेलेले सजीवच टिकून राहातात. जे निवडले जात नाहीत त्यांच्या जाती-प्रजाती नष्ट होतात याविषयीं असंख्य दाखले लेखिकेने दिले आहेत. प्रत्येक प्रजाती जीवनकलहात टिकून राहण्यासाठी धडपडत असते. ही धडपड, हा संघर्षच उत्क्रांतीचा गाभा आहे. हे अधिक स्पष्ट करून दाखविण्यासाठी लेखिकेने जणू आपले बोट धरून उण्या-पुऱ्या साडेतीन अब्ज वर्षांचा प्रवास घडवला आहे. सामान्यत: आपण "स्थळां"चा प्रवास करतो. लेखिका आपल्याला "काळा" तून घेऊन चालतात. एच्. जी. वेल्स ह्यांनी संकल्पिलेल्या "कालयंत्रा'' (टाईम मशीन)मधून जात असल्याचा भास होतो. "वाटे"मध्ये विविध जाती-प्रजाती कशा उद्भवल्या व उत्क्रांत झाल्या ह्याचे त्यांनी काही प्रातिनिधिक उदाहरणे देऊन मनोहारी दर्शन घडविले आहे. चाळणीत अडकून पडल्यामुळे पुढे सरकू न शकलेल्या दुर्दैवी प्रजातींचे त्यांनी कारणे दाखवून उल्लेख केले आहेत. एकंदरीत हा प्रवास करीत असताना एखादा अद्भुतरम्य चित्रपट पाहात असल्यासारखे वाटते.

उत्क्रांती एकाएकी एका रात्रीतून घडत नसते. ती एक अतिशय संथपणे घडत जाणारी प्रक्रिया आहे. ज्याप्रमाणे आपण एका उडीत पर्वताचे शिखर गाठू शकत नाही; परंतु तेच एकएक पाऊल पुढे टाकीत, हळूहळू ,चढत गेलो तर शिखरापर्यंत पोचू शकतो हे चपखल उदाहरण देऊन उत्क्रांती ही साठत-साठत जाणारी गोष्ट आहे हे लेखिका सहज पटवून देतात. "ह्या सर्व गोष्टी हळू हळू एक एक पायरीने होत होत हजारो पिढ्यांमध्ये घडल्या" असे सांगतात. "पण घाई कोणाला आहे?" असे काहीसे मिष्कील पण वास्तव असे प्रश्नरूप विधान सुलभाताई करतात. आणि लगेच, "न संपणारा काळाचा पट्टा हे उत्क्रांतीचे बलस्थान आहे." असे सुभाषितवजा वाक्यही टाकतात.

संपूर्णपणे निसर्गाच्या आज्ञेप्रमाणे होत असलेली उत्क्रांती ही एक हेतुशून्य प्रक्रिया आहे. तिला कोणताही उद्देश नाही, ठरलेले असे गंतव्य नाही. निसर्गावर कोणत्याही भाव भावनांचे आरोप करता येत नाहीत. तो नुसता असतो. तो सुष्ट नाही की दुष्ट नाही, सुरूप नाही वा कुरूप नाही, कनवाळू नाही किंवा क्रूर नाही, त्याला कोणीही कर्ता, चालक वा नियंता नाही हे लेखिका आवर्जून सांगतात.

"मानवी जगा"विषयी चर्चा करण्यासाठी लेखिकेने एक स्वतंत्र विभाग ग्रंथाला जोडला आहे. मानवाचे या सृष्टीतील वैशिष्ट्यपूर्ण स्थान मान्य करूनच त्या ही चर्चा करतात. अर्थात ती करतानाही त्यांनी विज्ञानाचा पदर सोडलेला नाही. उत्क्रांतीच्या मूळ तत्त्वांशी असलेली नाळ तुटू दिलेली नाही. विज्ञानाच्या मध्यवर्ती धाग्याभोवतीच तर त्यांनी हा संपूर्ण गोफ गुंफला आहे. ह्या अथांग कालप्रवाहात उत्क्रांतीच्या तत्त्वाच्या काडीचा आधार घेत वाहात आलेल्या या द्विपादाचे महत्त्वाचे बलस्थान म्हणजे त्याचे भावविश्व.

माणसाचे मन हे परस्पर भिन्न (आणि कित्येकदा तर परस्परविरुद्धही) अशा अनेक भावभावनांची गुंफण आहे. राग, लोभ, दया, करुणा, वात्सल्य, हेवा, मत्सर, सहानुभूती, प्रेम, सहिष्णुता, कृतज्ञता, कृतघ्नता, क्रौर्य, आदि किती तरी विकारांनी मानवी मनाचा आश्रय घेतलेला असतो. उत्क्रांतीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर माणसाला कधीतरी अशा विकारांचा फायदा झाला असावा. आणि म्हणूनच त्या त्या भावना निर्माण करणाऱ्या जोडण्या मेंदूत होऊन त्यांच्यात स्रवणारी रसायने उत्क्रांत झाली असावीत. ह्या भावनांना चांगले , वाईट अशी विशेषणे आपण लावतो. निसर्गात त्या फक्त "वृत्ती" असतात. काहींना सद्गुण तर काहीना दुर्गुण ठरविले जाते ते आपल्या त्याविषयींच्या प्रतिक्रियांवरून. ह्या

प्रतिक्रियांमधून माणसाचे विचारविश्व विस्तारले. ह्या विस्ताराचेच नाव "संस्कृती".

माणूस हा "माणूस" म्हणून उत्क्रांत होण्यापूर्वी "स्वार्थ" हाच सर्व सजीव सृष्टीचा पाया होता. (मानवेतर सृष्टीत तो अजूनही तसाच आहे.) परंतु कुठल्यातरी टप्प्यावर स्वार्थाबरोबरच परार्थसुद्धा प्रजाती टिकून राहाण्यासाठी फायद्याचा ठरतो हे उमगले. आणि परार्थ माणसाच्या जीवनात स्थिर झाला. अर्थात स्वार्थ पूर्णपणे सुटला नाही. एका परीने परार्थातही स्वार्थाचा भाग असतोच. ह्यामुळे एक पेच उभा राहिला. माणसाला "दुहेरी अस्तिवाला " सामोरे जावे लागले. एक स्वत:साठी आणि एक समाजासाठी. एकीकडे तो "स्वतंत्र जीव" आहे. तर दुसरीकडे "समाजाचा घटक" आहे. त्यात त्याच्या भावविश्वाची ओढाताण होते आहे. स्वत:च्या तसेच आपल्या कुटुंबाच्या हिताची चिंता वाहात असतानाच तो समाजाच्या कल्याणाचीही सोय पाहात असतो. समाजासाठी रामराज्य आणण्याचे, महामानव बनण्याचे स्वप्न तो पाहातो आहे. ते पूर्ण होण्यासाठी संस्कृतीच्या प्रवासात विकसित झालेली जीवनमूल्ये टिकून राहणे आवश्यक आहे. कारण ती दिशादर्शकाचे दीपस्तंभ म्हणून कार्य करतात, असा लेखिकेचा निष्कर्ष आहे आणि त्यासाठी त्या "नेचर " आणि "नर्चर" अशा दोन्हीची आवश्यकता अधोरेखित करतात.

माणसाला हे शक्य आहे. कारण त्याला निसर्गविज्ञानाचा आधार आहे. ह्या आधाराचे मूळ मेंदूत आहे. सजीवाच्या मेंदूवर जनुकांच्या आज्ञावलींचे नियंत्रण असते. परंतु मानवी मेंदू इतर सजीवांप्रमाणे केवळ प्राथमिक अवस्थेत रेंगाळला नाही. त्याच्यात लवचिकता आहे.त्यामुळे तो विकसनशील बनला आहे. त्याच्या ठिकाणी संस्कारक्षमता आली आहे. तो स्वतंत्रपणे विचार करू शकतो. परंतु मेंदूच्या या स्वातंत्र्याचा उपयोग एका मर्यादेतच केला जातो. कारण माणूस हा समाजाचा घटक असतो. 'स्व' तंत्राने वागण्यापेक्षा 'समाज' तंत्राने वागणे त्याला सोयीचे व सुरक्षिततेचे वाटत असते. कधीकाळी उत्क्रांतीच्या प्रवासात फायद्याची ठरलेली "टोळीची मानसिकता " माणसाच्या मेंदूत पक्की रुजली आहे. त्यामुळे लहानपणी मनावर झालेले संस्कार, त्यांतून रूढ झालेल्या समजुती, श्रद्धा, अंधश्रद्धा दृढ होत जातात. घट्टपणे धरून ठेवलेल्या ह्या खुंट्या सोडणे कठीण होऊन बसते. परंतु माणसाच्या स्वातंत्र्याला पडणाऱ्या या सांस्कृतिक मर्यादा ओलांडण्याची क्षमताही ह्या मेंदूत आहे. तिचे नाव "विवेक प्रज्ञा "(रीझन).

गेल्या कांही लाख वर्षांत विकसनशील मेंदूत कांही गुंतागुंतीची चक्रे उत्क्रांत झाली आहेत. त्यांतूनच या विवेकप्रज्ञेची प्राप्ती झाली आहे. ही प्रज्ञा मानवाला 'योग्य-अयोग्या' चा विचार करण्यासाठी मार्दर्शन करते. ज्ञानाचा निकष लावून त्याप्रमाणे कृती करण्याचा आदेश देते. चुकीच्या समजुती, अंधश्रद्धा, जुन्या रूढी यांच्यावर मात करण्याचे बळ देते. थोडक्यात ही विवेकप्रज्ञासुद्धा नैसर्गिकपणे उत्क्रांत झाली असून पूर्णपणे विज्ञानसिद्ध आहे. हे सुलभाताई मोठ्या खुबीने वाचकांना समजावून देतात. "एखाद्या तत्त्वाची, व्यक्तिविरहित चिकित्सा करण्याची क्षमता ही मानवी बुद्धीची फार मोठी झेप आहे." हे ह्या प्रज्ञेच्या संदर्भात केलेले विधान लेखिकेच्या प्रतिभेचीही झेप दर्शविते.

ग्रंथामध्ये लेखिकेने आपल्या विषयाची अगदी सांगोपांग विस्तृत चर्चा केली आहे. ती करण्याच्या ओघात त्यांनी निसर्गाचे महत्त्व विशद केले आहे. ह्या सृष्टीचा कोणी कर्ता-करविता नाही,कोणी चालक वा नियंता नाही सर्व व्यापार विज्ञानाच्या नियमांनुसार होतात. त्यामुळे ईश्वराचे अस्तित्व, त्याचे सर्वशक्तिमत्व, तसेच व्रत-वैकल्ये , सक्षात्कार, गूढात बोट दाखवून केलेले भविष्यकथन, अंतर्ज्ञान, चमत्कार आदि समजुती निरर्थक असून त्यांना कोणताही शास्त्रीय आधार नाही हे त्या सहजपणे पण निश्चितपणे नमूद करतात. मुख्य म्हणजे त्यात कुठलाही अभिनिवेश नाही. त्यांनी केलेल्या व्यासंगपूर्ण विवेचनाचा तो अगदी सहज, स्वाभाविक निष्कर्ष आहे.

पुस्तकाची भाषा सुबोध आणि रसाळ तर आहेच, शिवाय त्यात लालित्य आहे. लाघव आहे. विज्ञानासारखा काहीसा गद्य विषय सुलभाताईंनी अतिशय प्रसन्न आणि खेळकर पद्धतीने हाताळला आहे. ( हे दोन गुण बहुधा लेखिकेच्या व्यक्तिमत्वातच असावेत.) लेखनशैली इतकी वेधक आणि बोलकी आहे की जणु काही लेखिका आपल्या समोर बसून विषय समजावून सांगत आहेत असा सारखा भास होतो. उद्बोधन, प्रबोधन आणि रंजन अशा तीनही गोष्टी सहज साध्य झाल्या आहेत. सहज लक्ष वेधून घेईल असे सुंदर मुखपृष्ठ आणि सुबक छपाई ह्या आणखी दोन जमेच्या बाजू.

थोडक्यात हे एक अप्रतिम पुस्तक असून विज्ञानाची आवड असलेल्या (आणि नसलेल्यासुद्धा) सुशिक्षित वाचकांनी आवर्जून वाचावे अशी शिफारस करणे अनाठायी होणार नाही. अल्पावधीत पुस्तकाच्या चार आवृत्या निघाल्या हे त्याच्या यशस्वितेचे गमक ठरावे. वाचकप्रियतेचेही.

**गोफ जन्मांतरीचे**

*डॉ.सुलभा ब्रह्मनाळकर,*

राजहंस प्रकाशन, पुणे.

पृ.सं. 346, किं रु 300

bhalchandra.kalikar@gmail.com

•••

## वाचकांना नम्र निवेदन

*आजचा सुधारक*चा मुद्रित अंक सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार वार्षिक वर्गणी घेणे सुरु करण्यात येत आहे.

**वार्षिक वर्गणी**

व्यक्तिंसाठी रु. 300

संस्थांसाठी रु. 350

मनी आर्डर अथवा payable at par चेक ने *आजचा सुधारक* च्या नावे खालील पत्त्यावर पाठवावी:

***आजचा सुधारक***

201, श्री मोहिनी राज,

खरे टाऊन, धरमपेठ,

नागपूर 440010